## प्रकरण - ३

## श्री. जीव यांच्या प्रहसनांचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन

श्री. जीवन्यायतीर्थ हे विसाव्या शतकातील एक श्रेष्ठ नाटककार होते. त्यांच्याकडून लिहिल्या गेलेल्या प्रहसनांचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विविध विभागात वर्गीकरण करून त्या प्रहसनांचे अध्ययन या प्रकरणात करण्यात येत आहे.

प्रहसने ही मुख्यतः त्या त्या काळातील समाजरीतींवर प्रकाशझोत टाकणारी असतात. समाजरीतींमधे चांगल्या वाईट प्रथा, चालीरीती, अंधश्रद्धा, वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा समावेश होतो. समाजातील वाईट प्रथा, चालीरीती, अंधश्रद्धा दाखवून, त्यांच्यावर घणाघाती हल्ला करून त्यांचा समाजावर होणारा विकृत परिणाम या प्रहसनांनी दाखविला आहे आणि त्याद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे. समाजव्यवस्थेची अंगे असलेल्या धर्म, कुटुंब, अर्थव्यवस्था, लोकसंस्कृती, राजसत्ता, राष्ट्रनिष्ठा, विज्ञान या घटकांचा विचार करून या प्रहसनांचे वर्गीकरण करण्यात येत आहे.

**समाजशास्त्र :-**

सामाजिक घटनांच्या अभ्यासाशी निगडित असणाऱ्या शास्त्राला समाजशास्त्र असे म्हटले जाते. सामाजिक संबंध, मानवी व्यवहार, सामाजिक क्रिया, समाजव्यवस्था ही समाजशास्त्राच्या अभ्यासाची अंगे आहेत. एखाद्या घटनेचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन करताना केवळ वर्तमान काळातील ती घटनाच नव्हे तर त्या घटनेला कारणीभूत ठरणारी भूतकाळातील परिस्थिती, भविष्यकाळात त्या घटनेचे उमटणारे पडसाद, त्या घटनेमुळे समाजातील इतर घटकात होणारे बदल या सर्वांचा अभ्यास करणे जरूरी आहे.

समाजात निर्माण होणाऱ्या समस्या या समाजातील काही व्यक्तींमुळेच निर्माण होत असतात. असा एकही समाज नाही की ज्यात समस्या आढळून येत नाही. समस्यांचा समाजावर होणारा विघातक परिणाम टाळण्यासाठी त्या समस्यांचा अभ्यास करून त्याचे निराकरण करणे गरजेचे असते. समाजात सतत परिवर्तनही होत असते.

जीवनपद्धती, जीवनमूल्ये, आचारविचार, संस्कार, यामुळेही समाजातील भिन्न विचारसरणीच्या घटकांमधे संघर्ष होत असतो. बदलत्या परिस्थितीचा स्वीकार न केल्यामुळे नवी व जुनी मूल्ये यात संघर्ष होऊ शकतो. या सर्व बदलास सामाजिक परिवर्तन असे म्हटले जाते.

सामाजिक परिवर्तनाचे समाजावर योग्य व अयोग्य दोन्ही पद्धतीचे परिणाम घडून येत असतात. जर सामाजिक परिवर्तन योग्य दिशेने होत असेल आणि समाजाच्या विकासाच्या दृष्टीने त्याचा उपयोग होणार असेल तर ते परिवर्तन योग्य समजले गेले पाहिजे. त्याउलट जर सामाजिक परिवर्तनाचा परिणाम समाजाची अधोगती करण्यासाठी आणि समाजाचा ऱ्हास होण्यात होणार असेल तर ते परिवर्तन अयोग्य मानले गेले पाहिजे.

उदा. गर्भजलचिकित्सेचा शोध मानवी कल्याणाकरीता, गर्भातील दोष समजावून घेऊन ते दूर करण्याकरीता लागला होता. परंतु सध्या याचा उपयोग स्त्री लिंग चिकित्सेसाठी केला जात आहे. याचा समाजावर दुष्परिणाम होऊन स्त्रियांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे.

समाजातील या अशा समस्यांचे निराकरण करण्यासाठी केवळ व्याख्याने देऊन किंवा कायदे करून भागत नाही. समाजातील या समस्या जर समाजासमोर रूपकांच्या माध्यमातून मांडल्या गेल्या तर समाजाला त्या जास्त भावतात. याचसाठी विसाव्या शतकातील बेरोजगारी, गरीबी, स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील इतर समस्या समाजासमोर मांडण्यासाठी श्री. जीव यांनी प्रहसनांचा पर्याय निवडला. हास्याच्या माध्यमातून जर समाजातील व्यंग समाजासमोर आणले तर समाजाला त्याचा जास्त उपयोग होतो आणि ते जास्त परिणामकारक ठरते. त्यामुळे समाजात प्रक्षोभही उसळत नाही.

समाजशास्त्रातील पुढील पैलूंचा विचार प्रहसनांचा अभ्यास करताना करीत आहे. १) **राजकीय**, २) **धार्मिक**, ३) **आर्थिक**, ४) **लोकसंस्कृती**, ५) **कौटुंबिक**, ६) **राष्ट्रनिष्ठा**, ७) **विज्ञान**. समाजशास्त्राशी निगडित असलेल्या या पैलूंवर प्रहसनांच्या माध्यमातून प्रकाशझोत टाकून तो तो पैलू या प्रहसनाशी कशाप्रकारे निगडित आहे

यावर विवेचन करण्यात आले आहे. श्री. जीव यांची अभ्यासासाठी घेतलेली चौदा प्रहसने आहेत. यापैकी प्रत्येक प्रहसन अनेक पैलूंशी निगडित असल्याने प्रत्येक पैलूच्या दृष्टिकोनातून त्या प्रहसनाचा विचार करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. प्रहसनांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करीत आहे.

१) **राजकीय** - स्वातंत्र्यसन्धिक्षणम्, चण्डताण्डवम्, क्षुतक्षेमीयम्

२) **धार्मिक** - भट्टसंकटम्, पुरुरमणीयम्, क्षुतक्षेमीयम्, विवाहविडम्बनम्, रामनाम-दातव्य चिकित्सालयम्, योग्ययुगलमेलनम् .

३) **आर्थिक** - दरिद्रदुर्दैवम्, चौरचातुरियम्, क्षुतक्षेमीयम्, चिपीटकचर्वणम्, विवाहविडम्बनम्,

४) **लोकसंस्कृती** - विवाहविडम्बनम्, रागविरागम्, विधिविपर्यासम्

५) **कौटुंबिक-** भट्टसंकटम्, विवाहविडम्बनम्, दरिद्रदुर्दैवम, चिपीटकचर्वणम्

६) **राष्ट्रनिष्ठा** - स्वातंत्र्य सन्धिक्षणम्, चण्डताण्डवम्

७) **विज्ञान** - शतवार्षिकम्.

८) **वनभोजनम**

श्री. जीव यांच्या प्रहसनांचा अभ्यास करताना एकेका पैलूद्वारे प्रत्येक प्रहसनाचे विवेचन करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

१) **राजकीय :-**

राजकीय दृष्टिकोनातून प्रहसनांचा विचार करताना स्वातंत्र्यपूर्व, स्वातंत्र्योत्तर अशा प्रहसनांचे कथानक पाहून त्यानुसार त्या काळातील सामाजिक परिस्थिती, राजघराणी, राजेशाही पद्धती किंवा स्वातंत्र्योत्तर भारतातील लोकशाही पद्धती, सरकार, त्यांची कामकाजाची पद्धत यांचा विचार करावा लागतो. शासनातील अधिकारी, त्यांचा एकमेकांशी व्यवहार, रयतेकडे पाहण्याचा दृष्टिकोन, काम करण्याची पद्धत या बाबींचा विचार करावा लागतो.

राजकीय परिस्थिती अस्थिर असताना जनसामान्यांची वर्तणूक, शासनपद्धतीतील अधिकाऱ्यांची शासकाविषयी असणारी निष्ठा, आपसात वागण्याची

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

पद्धत यांचा विचार राजकीय प्रहसनात करीत आहे. याउलट सर्वसामान्य माणसांवर ओढवणाऱ्या आपत्तीमधे जसे भूकंप, पूर, दुष्काळ या परिस्थितीत राजकीय नेते, शासक, अधिकारी यांची जनतेशी असणारी वागणूक यांचाही विचार वैशिष्टयपूर्ण ठरतो.

श्री. जीव यांनी लिहिलेल्या प्रहसनांमधे स्वातंत्र्यपूर्व काळातील तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील प्रहसनांचाही समावेश आहे.येथे स्वातंत्र्य सन्धिक्षणम्, चण्डताण्डवम्, क्षुतक्षेमीयम् या प्रहसनांचा राजकीय दृष्टिकोनातून विचार करीत आहे.

१) **स्वातंत्र्य सन्धिक्षणम्** :- हे एकांकी रूपक आहे.

या प्रहसनामधे स्वातंत्र्याच्या उंबरठयावर उभ्या असलेल्या भारताचे चित्रण करण्यात आले आहे. यामधे भारतमाता, प्राच्यसंस्कृती, नव्यत्रय, माहम्मद हे प्रतीकरूपाने रंगमंचावर वावरताना दिसतात. भारतमाता हे भारताचे प्रतीक आहे. प्राच्य संस्कृती हे भारतीय उच्च विचाराच्या संस्कृतीचे प्रतीक आहे तर नव्यत्रय हे आधुनिक विचाराच्या भारतीयांचे प्रतीक आहे. धनेश, गणेश आणि रणेश या तिघांना मिळून नव्यत्रय असे संबोधण्यात आले आहे. हे तिघेही नवीन युगातले (आधुनिक) भारतीय आहेत ज्यांना प्राचीन संस्कृती आणि परंपरा यांचा आदरही नाही आणि माहितीही नाही आणि माहम्मद हे मुस्लिम उग्रवादाचे प्रतीक आहे.

भारत जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा इंग्रजांनी जे फुटीचे राजकारण केले त्यामुळे भारताचे भारत आणि पाकिस्तान असे तुकडे पडले. हे सर्व राजकारण या प्रहसनामधे चित्रित करण्यात आले आहे.

"ममैक वचनं पाकिस्तानं तदङ्गीकुरूत अन्यथा स्वातन्त्र्यं विघटितं भवतु ।" [१]
भारतातील वेद, उपनिषदे यांची विकृत शब्दात वर्णने ऐकल्यावर प्राच्यसंस्कृती नव्यत्रयांच्यावर टीका करते.

इदमुन्माद लक्षणम् । [२]

यामध्ये देखील फुटीचा राजकीय हेतू दिसून येतो. देशप्रेमी भारतीयांचे भारतावरील प्रेम हे अबाधित आहे. परंतु राजकीय हेतूने जेव्हा भारत पाकिस्तान

फाळणी केली गेली तेव्हा भारतीयांची झालेली अवस्था प्राच्यसंस्कृती आणि भारतमाता यांच्याद्वारे चित्रित केली गेली आहे.

या प्रहसनाचा शेवट भारताच्या फाळणीत आणि सदसद्विवेकबुद्धी वापरत असलेल्या यतिराट् आणि प्राच्यसंस्कृती यांच्या कारागृहात जाण्याने केला आहे. भारताची फाळणी होत असताना देशप्रेमी भारतीयांची झालेली दुरवस्था, फाळणीमुळे देशाला भोगावे लागलेले कष्ट यांचे मर्मभेदी चित्रण या प्रहसनात केले गेले आहे.

इंग्रजांना भारत अखंडपणे स्वतंत्र होऊ देणे मान्य नव्हते. या विशाल राष्ट्राकडून त्यांना भविष्यकाळात धोका निर्माण होण्याची भीती वाटत होती.

या प्रहसनामध्ये हास्य निर्माण करण्याऱ्या बाबी फार थोडया असून केवळ प्रतीकात्मक दृष्टीने त्या काळातील घटना दाखविण्यात आल्या आहेत.

२) **चण्डताण्डवम्** :- हे दोन अंकी प्रहसन आहे. प्रथम अंकात दुसऱ्या महायुद्धात उतरलेल्या सर्व देशांच्या प्रतिनिधींचे या युद्धाविषयी मत आणि त्यांची या जगावर राज्य करण्याची सत्ता लालसा दाखवण्यात आली आहे.

रशियाचा नेता स्टॅलिन, जर्मनीचा हुकुमशहा हिटलर, इटलीचा मुसोलिनी, इंग्लंडचा प्रतिनिधी आंग्ल सचिव इ. सर्व पात्रे मिळून आपापल्या देशाचे राज्य जगावर चालावे या दृष्टीने विचार करताना दिसतात. यासोबतच जपान, अमेरिका, फ्रान्स हेही युद्धात उतरतात.

या प्रहसनाच्या प्राक्कथनातच कवी श्री. जीव यांनी असे स्पष्ट केले आहे की या रूपक प्रकाराला अन्य कोणत्याही रूपक वर्गीकरणाच्या अभावी प्रहसन या श्रेणीत घातले जात आहे.

This two act play should come under 'Prahasana' (Farce) in the absence of any other classification. [३]

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात म्हणजेच १९४१-४६ या काळात वेगवेगळया राष्ट्रांनी जी हिंसात्मक कृत्ये केली त्याचे काल्पनिक चित्र या रूपकात दाखवण्यात आले आहे. विश्वाच्या शांतीसाठी प्रयत्नशील असलेल्या भारताचे प्रतिबिंब या प्रहसनात दर्शविले गेले आहे.

15586

भौतिक वादाचे समर्थन करणारा रशियाचा नेता स्टॅलिन हा धर्माचरण करणाऱ्या व त्याचे अनुयायी असणाऱ्या सर्वांना धर्म सोडून सुखमय जीवन व्यतीत करण्यासाठी भौतिकवादाचे समर्थन करण्यास सांगतो. तेथे आलेला धर्मपुरूष धर्माची अनिवार्यता प्रतिपादन करतो.

"भो नायक ! न खलु सम्भवति धर्म विना राष्ट्रनिर्माणम् ।

धर्ममूल पुनः स इशिता विश्वेषाम् । "[४]

स्टॅलिन आपल्या सेनापतीला त्याला बंदी बनविण्याची आज्ञा करतो. जीवाच्या भयाने धर्मपुरूष भारताकडे जातो तर संपूर्ण युरोपवर पापपुरूषाचे सावट दिसू लागते.

या प्रहसनात सर्व देशांचे प्रतिनिधी जर्मनी, जपान, फ्रान्स व इंग्लंडचे प्रतिनिधी, अमेरिका यांचे आपापसातील युद्ध, परस्परांविरूद्ध एकमेकांना मदत तसेच लोभ व क्रोध हे ही प्रतिकात्मकरीत्या दाखविण्यात आले आहेत.

येथून दुसरा अंक सुरु होतो.

युरोपवर विजय मिळवून पापपुरूष भारताकडे येऊ लागतो परंतु धर्म व अहिंसा या तत्त्वांमुळे तो भारतात प्रवेश करू शकत नाही.

धर्मभ्रष्ट राष्ट्रमुष्ट इवच्छिन्ननासारजजुर्धावत्युतपथम् । धर्महीनं राष्ट्रच्युतखलीनहयवच्चर्व्वयति शासनबल्गारसनाम् । धर्मशासनरहितं राष्ट्रमहितं साधयति मात्स्यन्यायसदृशम् । धर्महीना नीतिरपि स्वरहीना गीतिरिव विफला । [५]

भारतीय संस्कृतीतील अहिंसा, क्षमा इ. उदात्त तत्त्वांचे समर्थन या प्रहसनात दाखवण्यात आले आहे. भारतच जगाचे नेतृत्त्व करू शकेल आणि जगातील निरपराध, पापभिरू, सदाचरणी लोकांना आश्रय देऊ शकेल असे यातून सुचविण्यात आले आहे. राजकीय दृष्टया या प्रहसनात महायुद्धाच्या वेळी असलेली राजकीय स्थिती चित्रित करण्यात आली आहे. धर्म हाच सर्वांना तारणारा ठरतो. तसेच वेदातील 'धर्मो रक्षति रक्षितः।' या तत्त्वाचे समर्थन या प्रहसनात केले आहे.

पाश्चात्य पात्रे आणि त्यांची भाषाशैली यांचा विचार येथे केला गेला आहे. तरीही प्राचीन नाटयशास्त्रानुसार प्रहसनाची रचना करण्यात आली आहे.

प्राचीन नाटयशास्त्र आणि पाश्चात्य नाटयशैली यांचे सुंदर मिश्रण या प्रहसनात दिसून येते. शृंगारिकतेपासून दूर जाऊन विश्वकल्याणासाठी मनोरंजन करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

३) **क्षतुक्षेमीयम्** :-

प्रहसन प्रथम आणि द्वितीय अशा दोन मुखसंधीमधे विभाजित करण्यात आले आहे. प्रथम मुखसंधीमधे पृथ्वीवरील तर द्वितीय मुखसंधीमधे यमपुरीतील कथेचे चित्रण दाखवले आहे.

रूपकचक्रम् या नाटकसंग्रहात या प्रहसनाचे प्रकाशन झाले आहे. या प्रहसनाचे कथानक पौराणिक असून त्या काळातील यमनगरी आणि तेथील राजकीय परिस्थिती तसेच पृथ्वीवरील समाजजीवनाचे चित्रण यात केले आहे.

यमराजाचा सहाय्यक चित्रगुप्त पृथ्वीवर एका धनवान श्रीमंताकडे, रंगनाथाकडे येतो. पृथ्वीवरील रंगनाथाचा प्रासाद पाहून चित्रगुप्तालाही त्याच्याकडे यायची इच्छा होते.

गुप्तधन काढून देण्याच्या अटीवर कंजुष रंगनाथ चित्रगुप्ताची सरबराई करण्यास तयार होतो. त्याचे फक्त एक वर्षाचे आयुष्य शिल्लक असल्याचे चित्रगुप्त सांगतो.

रंगनाथ चित्रगुप्ताला यावर उपाय विचारतो तेव्हा चित्रगुप्त सांगतो की हे सर्व धर्मराज म्हणजे यमच करू शकतो. पुन्हा पुन्हा विचारल्यावर तो सांगतो की वर्षभर दीन दुःखी माणसांची घरे गवताने शाकारून दे. रंगनाथ मोठया दुःखी मनाने हे करण्यास तयार होतो. यानंतरच्या अंकात रंगनाथ मृत्यूनंतर चित्रगुप्त व यमराजाच्या समोर जातो. चित्रगुप्ताला त्याला पुन्हा पृथ्वीवर पाठवण्याचे आठवते. पोथीवर नाव नीट दिसत नसल्याचे सांगितल्याने यम ब्रह्माला विचारण्यास जातो. यावेळी चित्रगुप्त त्याला उपाय सांगतो. त्यानुसार वागल्यानंतर चित्रगुप्त व यमाला त्याला पृथ्वीवर परत पाठवावे लागते.

यमपुरीतील मनमानी कारभाराचे चित्रण येथे केले आहे. चित्रगुप्ताने पृथ्वीवर आल्यानंतर केवळ रंगनाथाला दीर्घायुष्याचे आश्वासन दिले असल्या कारणाने तो प्रत्यक्ष यमराजाशी सुद्धा खोटे बोलतो. आपल्या नोकरावर पूर्णपणे विश्वास ठेवणाऱ्या यमराजाला मात्र आपल्याच नोकराकडून न कळत विश्वासघात सहन करावा लागतो.

रंगनाथ यमपुरीत आल्यानंतर चित्रगुप्त यमाला त्याचे नाव वहीत दिसत नसल्याचे सांगतो व यमराज विधात्याला विचारण्यासाठी जातात.

आपण रंगनाथाला दिलेले वचन खरे करण्यासाठी यमपुरीचे नियमही बदलण्यास चित्रगुप्त तयार होतो.

एकूणच साध्या कथानकाला पौराणिक साच्यात घालून त्याला एक हास्याची झालर निर्माण झाली आहे. यात केवळ संवादामुळेच नाही तर शारीरिक अभिनयाने देखील हास्य निर्माण करण्यात आले आहे.

या कथानकात पौराणिक काळातील राजकीय परिस्थिती, त्या काळातील सत्ताधीश, चित्रगुप्तासारखे दिलेल्या वचनासाठी धर्मभंग करणारे त्यांचे अधिकारी आणि स्वार्थासाठी परोपकार करणारे रंगनाथासारखे मानव यांचे व्यवस्थित चित्रण करण्यात आले आहे.

**निष्कर्ष** :-

१) भारतमातेवरील भारतीयांचे प्रेम आणि तिच्या अखंडतेसाठी त्यांनी केलेला आटापिटा, शेवटी फुटीच्या राजकारणाचा झालेला विजय, त्यामुळे मिळालेल्या फाळणीच्या वेदना यांचे चित्रण प्रभावी ठरते.

२) चण्डताण्डव मधे दुसऱ्या महायुद्धाच्या वेळची राजकीय परिस्थिती पुरेपूर रेखाटली आहे. शेवटी विश्वशांतीसाठी युद्ध नव्हे तर अहिंसा, न्याय, समता ही तत्त्वे महत्त्वाची आहेत हे सिद्ध करण्यासाठी लेखक प्रयत्नशील आहेत.

३) क्षुत म्हणजे शिंक शिंकण्यामुळे त्याचे आयुष्य वाढून क्षेम म्हणजे कल्याण होते. राजकीय दृष्टयाही हे कथानक आजच्या युगाला लागू पडणारे आहे.

श्री. जीव यांनी लिहिलेल्या प्रहसनांमधे स्वातंत्र्यपूर्व काळातील तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील प्रहसनांचाही समावेश आहे. परतंत्र असताना भारतातील लोकांचे आचारविचार, सत्तेपुढे हांजीहांजी करणे, स्वातंत्र्यासाठी मोडेन पण वाकणार नाही असे निरनिराळे दृष्टिकोनही श्री. जीव यांच्या लेखनात दिसून येतात. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील असणाऱ्या त्रुटी, त्यामुळे ओढवणाऱ्या समस्या याही बाबींचा विचार श्री. जीव यांच्या लेखनात आढळतो.

२) **धार्मिक** :-

धर्म हा मानवी जीवन व्यापून उरला आहे.

'धृ धारयति इति धर्मः।'

'धर्मो रक्षति रक्षितः।'

अशी धर्माबाबतची वैदिक वचने प्रसिद्ध आहेत. संकटकाळी धार्मिक मूल्ये, श्रद्धा यांच्यामुळे मनोधैर्य वाढते. जरी समाजात अनेकविध धर्म असले तरी त्यांची मूलतत्त्वे समानच आहेत.

धर्म हा समाजाचा ठळक आधार असतो तसेच त्याच्यामुळे मानवी वर्तनांवर नियंत्रण येते. समाजातील सर्व घटना, सर्व मानवी व्यवहार यांच्या मुळाशीही धर्म असतो. मानवातील सद्गुणांचा विकास, पावित्र्यपूर्ण वर्तनाची भावना, जटिल प्रश्नांचे यशस्वी निराकरण यांचे कारणही धर्मच आहे. मानवेतर इतर अलौकिक शक्तींवरील मानवाचा विश्वास म्हणजे धर्म होय अशी सर्वसाधारणपणे धर्माची व्याख्या करता येते.

या सर्व मुद्दयांचा विचार केला असता मानवी जीवनात वैयक्तिकरित्या किंवा सामुहिकरीत्या धर्माला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. या धार्मिक पार्श्वभूमीवर विसाव्या शतकातील प्रहसनांचा अभ्यास या मुद्दयाला धरून करीत आहे. प्रहसनांमधे मग ती कोणत्याही शतकातील असोत, त्यामधील धार्मिक पार्श्वभूमीला त्या प्रहसनांमधे अतिशय महत्त्व आहे. घडणाऱ्या प्रत्येक घटनेला सामाजिक परिस्थिती जशी जबाबदार असते तशीच धार्मिक स्थितीही असते. श्री. जीव यांनी लिहिलेल्या

भट्टसङ्कटम्, पुरुषरमणीयम्, क्षुतक्षेमीयम्, रामनामदातव्य चिकित्सालयम् या प्रहसनांमधील धार्मिकता या मुद्दयावर येथे विवेचन करीत आहे.

१) **भट्टसङ्कटम् :-**

हे पाच अंकी प्रहसन आहे.

प्रथम अंकात ब्राह्मणाच्या शयनागारातील चित्रण आहे.

दुसऱ्या अंकात ब्राह्मणाच्या यज्ञाने त्रासलेल्या राक्षसांकडून दिला गेलेला त्रास व पत्नीचे अपहरण आहे.

तिसऱ्या अंकात राजा व ब्राह्मणाची भेट व घडलेल्या अपहरणाचा वृत्तांत आणि त्यावर उपाययोजना आहे.

चौथ्या अंकात गूढपुरुषाकडून ब्राह्मणपत्नीचे ठिकाण निवेदन आणि त्या स्थळी पोहोचणे तर पाचव्या अंकात राक्षसांकडून ब्राह्मणपत्नीची सुटका व तिचे कुरूपत्व दूर होणे इ. चित्रण आहे.

आपल्या पत्नीच्या कुरुपतेला आणि कर्कशपणाला कंटाळलेला असूनही केवळ यज्ञकर्मासाठी ती आवश्यक असल्याने ब्राह्मण पत्नी कामिनीसोबत राहत आहे. जरी त्याला तिचा त्रास होत असला तरी त्याचे पत्नीवर निरतिशय प्रेम आहे आणि तिला राक्षसांनी पळवल्यानंतर यज्ञकर्मासाठी आवश्यक असूनही तो दुसरे लग्न करण्यास तयार होत नाही. शेवटी राक्षसांनी पकडलेल्या आपल्या कुरूप पत्नीला सर्वज्ञ साधूपुरुषाच्या मदतीने सोडवून तिला सुरुपही बनवतो.

हे पाच अंकी प्रहसन असून त्यातील ब्राह्मण यज्ञकर्मात प्रवीण आहे. त्याने केलेल्या यज्ञामुळे राक्षस अतिशय त्रस्त होतात यावरून त्याची याबाबतीतील कुशलता स्पष्ट होते. तसेच जेव्हा घरातील नोकर घरात आलेल्या राक्षसांना पाहून घाबरतो तेव्हा मंत्रविद्येने तो त्याला भयमुक्त करतो. राक्षसांच्या त्रासापासून मुक्त होण्यासाठी यज्ञ करणे आणि त्यामुळे राक्षसांनी त्याला त्रास द्यायला सुरुवात करणे हे सर्व धार्मिकतेकडे झुकणारे आहे. तसेच साधुपुरुषाने ध्यान करून ब्राह्मणाच्या पत्नीचा पत्ता सांगणे, साधुचे माकड बनणे, ब्राह्मणाच्या पत्नीचे सुंदर होणे यांनाही धार्मिकतेची व अद्भुततेची झालर आहे.

ब्राह्मणावर आलेल्या संकटाचा नाश ब्राह्मणाच्या धार्मिक आचरणामुळे आणि धर्मावरील विश्वासामुळे होतो.

२) **पुरुष रमणीयम्** :- हे दोन अंकी प्रहसन आहे.

पुरुष रमणीयम् या रूपकाला अन्य कोणत्या रूपक भेदाअभावी प्रहसन या भेदात घातले आहे असे श्री. जीव यांनी रूपकाच्या प्राक्कथनात सांगितले आहे. या प्रहसनात एका पुरूषाच्या लिंगपरिवर्तनाची कथा सांगितली आहे. तरी मुळात या रूपकात शिवस्तुती केलेली आहे व त्याच्या शक्तीची प्रशंसा केलेली आहे या प्रहसनाची सुरूवातच सूत्रधार आणि विदूषक व त्यातून उत्पन्न होणाऱ्या हास्याने होते.

सुबंधू आणि सोमदत्त हे दोन्ही तरूण सुशिक्षित आहेत तरीही त्यांना उपजीविकेचा मार्ग सापडत नाही. म्हणूनच त्यांना शिकलेल्या विद्येचा उपयोग नाही असे वाटते.

आन्विक्षिकी ह्युपलखण्डचयोपलक्ष्या ।
पुञ्जीकृताखिलरजः किलधर्मशास्त्रम् ।
भातित्रयी गुणमयी विपुला च गौणी ।
नो गौरवं सृजति किञ्च गुरुत्वमात्रम् । [६]

सुबन्धू व सोमदत्त या दोन बेरोजगार तरूण उपजीविकेच्या शोधात असताना दुःखितांना मदत करणाऱ्या सीमान्तिनी राणीच्या प्रासादापाशी पोहोचतात. द्वारपाल असलेल्या राजपुरूषाने सर्व सामान बाहेर ठेवायला सांगितल्यामुळे बंदिवासातही जावे लागते. त्याचवेळी एक वृद्ध दांम्पत्य तेथून दान घेऊन जात असते. त्यांच्याकडून त्यांना पती - पत्नी बनून राणीकडे जाऊन धनप्राप्ती करवून घेण्याचा सल्ला मिळतो. मित्राला पत्नी बनवून घेऊन जाण्यासाठी मदत मिळते.

धनप्राप्ती होऊन बाहेर पडल्यानंतर सोमदत्ताला आपल्या स्त्रीत्वाची प्रचीती येते. त्यामुळे एकुलता एक पुत्र असल्याने वंशाचा लोप होईल म्हणून तो विलाप करू लागतो. त्याचवेळी तेथे राजपुरुष येतो व सुबंधूवर स्त्रीच्या अपहरणाचा आरोप ठेवून त्याला स्त्रीला तेथेच ठेवून निघून जाण्यास सांगतो. यावरुन दोघांच्यात शक्ती

प्रदर्शन होते. त्यावेळी सुबंधूची ताकद कमी पडल्यावर तो शिवाचे स्मरण करताच राजपुरुष शिवाच्या रूपात प्रकट होऊन दोघांचे मीलन घडवून आणतो.

या प्रहसनात गरीबांना मदत करणारी राणी सीमांतिनी, राजपुरुष इत्यादी पात्रे धार्मिकतेकडे झुकणारी आहेत. चोरीसारखे अनैतिक काम युवकांनी करू नये असे सांगणारे वृद्ध दांपत्यही धर्माचरणाची शिकवण देते. प्रहसनात लिंग परिवर्तन जरी दाखवले असले तरी शिव प्रकृतीची एकरूपता दाखवून प्रहसनाची समाप्ती होते. त्यामुळे एकुणच प्रहसन धार्मिक वृत्तीकडे झुकणारे आहे.

३) **क्षुतक्षेमीयम्ः-**

यमराजाचा कर्मचारी चित्रगुप्त पृथ्वीवर आल्यानंतर रंगनाथ नामक एका कंजूष श्रीमंताकडे जातो. तो त्याला धर्मशाळेची वाट दाखवतो परंतु गुप्तधन सांगण्याच्या लोभामुळे चित्रगुप्ताची सेवा करणे रंगनाथाला भाग पडते. चित्रगुप्त त्याला गुप्तधन सांगतो व आयुष्य एक वर्ष शिल्लक असल्याचेही सांगतो व दीर्घायुष्यासाठी गरीबांची घरे वर्षभर गवताने शाकारून द्यावीत असेही सांगतो.

एक वर्षानंतर जेव्हा रंगनाथ स्वर्गात यमराजासमोर जातो तेव्हा चित्रगुप्त त्याला ओळखतो व यमराजाशी असत्य वागून रंगनाथाला दीर्घायुष्य मिळवण्याचा उपाय सांगून त्याची पाठवणी पुन्हा पृथ्वीवर करतो. या प्रहसनाची पार्श्वभूमी पौराणिक घेतल्यामुळे या प्रहसनाला धार्मिक रूप प्राप्त झाले आहे. यातील यमराज, चित्रगुप्त ही पात्रे हिंदू धर्मातील वेद पुराणातील आहेत. तसेच गोरगरीबांची सेवा करणे हे आपल्याकडील कोणत्याही धर्मात पुण्याचे काम मानले जाते. पृथ्वीवर केलेल्या पाप पुण्याच्या हिशोबानुसार स्वर्गात किंवा नरकात जागा मिळते ही आपल्याकडील समजूत आहे.

एकूणच या प्रहसनाला पौराणिक पार्श्वभूमी, पौराणिक पात्रे आणि हिंदू धर्मातील रूढी परंपरा आणि समजुती यांचा आधार मिळाल्यामुळे हे प्रहसन धार्मिक या गटात समाविष्ट केले आहे. या कथानकातील काही घटना आधुनिक मनाला न पटणाऱ्या आहेत. जर सत्य बोलणे हे पुण्य आणि असत्य भाषण हे पाप आहे तर

यमराजाच्या कर्मचाऱ्याने जो इतरांच्या पापपुण्याचा हिशोब ठेवतो, त्याने केलेले असत्य भाषण मनाला न पटणारे वाटते.

केवळ शिंकण्यामुळे एखाद्याला जीवनदान मिळणे आधुनिक मनाला न पटणारे आहे. केवळ आपण रंगनाथाला दिलेले वचन पूर्ण व्हावे म्हणून जगन्नियंत्याच्या कामात हस्तक्षेप करून चित्रगुप्ताचे आपले म्हणणे खरे करून घेणे हे धार्मिकतेला बाधा आणणारे वाटते.

**रामनामदातव्य चिकित्सालयम् :-**

क्षीब या एका वेडसर व्यक्तीने समाजातील वेगवेगळया स्तरातील आणि वेगवेगळया व्याधींनी ग्रस्त असलेल्या व्यक्तींना त्या त्या व्याधीनुसार दिलेली औषधे आणि पथ्ये यांचे कथानक या प्रहसनात आले आहे.

कोणताही रोग बरा होण्यासाठी शरीराबरोबर मनाचीही साथ लागते. यासाठी मनाची शक्ती वाढवण्यासाठी रामनाम घेणे आवश्यक असते असे या वैद्यबुवांचे म्हणणे असावे. रामनाम घेणे या उपायामुळे हे प्रहसन थोडे धार्मिकतेकडे झुकणारे वाटते. प्राकृतिक चिकित्सेचा अभ्यास केलेले हे पात्र प्रत्येक रोग्याला त्या त्या व्याधीनुसार साधी पथ्ये व औषधे सांगते.

कोणत्याही रोगाचे मूळ हे शारीरिक व मानसिक असते. म्हणून मानसिक दृष्टया सबल माणूस कोणत्याही आजारातून सहज बाहेर पडतो. यासाठी माणसाची कोठेतरी दृढ श्रद्धा असणेही जरूरी आहे. अशी श्रद्धा या कथानकातील प्रमुख पात्राच्या अंगी दाखवली आहे.

**विवाह विडम्बनम् :-**

रतिकांत या साठ वर्षीय विधुराच्या पुनर्विवाहाचे कथानक या प्रहसनात आले आहे. आपल्या समाजात पुरुष प्रधान संस्कृती आहे. त्यामुळे पुरुषांचे समाजात, कुटुंबात वर्चस्व दिसून येते. रतिकांत हाही अशाच पुरुष प्रधान संस्कृतीचा घटक आहे. कामाहून आल्यानंतर त्याच्या पुढे पुढे करण्यासाठी या वयातही त्याला पत्नीची आवश्यकता वाटते.

तो विधूर असूनही दुसरे लग्न करण्याचा इच्छुक आहे. परंतु त्याची बहीण खड्गधरा ही विधवा आहे. आपल्या धर्मशास्त्रानुसार विधवेने पुनर्विवाह करण्याची परवानगी नाही. पुरुषांना मात्र ती आहे. रतिकांत तिचे तोंड पाहणेही अशुभ समजतो.

त्वमेव वैधव्यदावादग्धमुखी शृगाली ।

त्वमिदानीं गृहाभ्यान्तर गच्छ । [७]

खड्गधरा ही खरे तर एक सारासार विचार करणारी समंजस स्त्री वाटते. परंतु रतिकांतला मात्र स्वार्थामुळे तिच्या कोणत्याही बोलण्याचे वाईट वाटते. स्त्रीला आधुनिक युगातही वाईट वागणूक मिळते. जी पूर्वापार चालत आली आहे. एकीकडे स्त्रीरूपातील देवीला पूज्य मानले जाते तर दुसरीकडे कुटुंबातील स्त्रीचा शारीरिक, मानसिक छळ होतो. पती असेपर्यंतच तिचे समाजातील अस्तित्व शुभ मानले जाते.

विधवांना मात्र शुभकार्यातून वगळले जाते. ही धार्मिक अंधश्रद्धा आहे. तसेच त्यांना समाजात योग्य स्थान मिळाले पाहिजे. घरातील व्यक्तींनी त्यांना योग्य व सन्मानाची वागणूक दिली तर समाजात त्यांना योग्य मान मिळेल.

**योग्ययुगलमेलनम् :-**

हलधर आणि जलधर हे दोन तरुण आपापल्या उपास्य दैवताबाबत अतिशय आग्रही आहेत. हलधर हा गोविंद म्हणजे कृष्णाचा तर जलधर हा राधेचा उपासक आहे. आपापल्या उपास्य दैवताचे गुणवर्णन करताना दोघेही अतिशय वाद घालतात. कोणताही एक निर्णय न झाल्याने मल्लयुद्धातून अंतिम निर्णय घेण्याचे ठरते.

राधा व गोविंद हे दांपत्य तेथे येते. येणाऱ्या आवाजाचा कानोसा घेऊन राधा गोविंदला सांगते की जलधरची पत्नी हलधरच्या पत्नीला झाडूने मारत आहे. हे ऐकून गोविंद हलधर व जलधरला घेऊन येतो. तेव्हा भांडण मिटवण्यासाठी आपण खोटे बोलल्याचे राधा सांगते.

जलधर हा तगडा असल्याने त्याचा प्रतिकार करण्यास हलधर असमर्थ होता. हलधर आपल्याला युद्धातून वाचविण्यासाठी राधेची प्रशंसा व मुक्त कंठाने उद्घोष

करतो. आपल्या उपास्य दैवताची स्तुती केल्याचे पाहून जलधर ही खूष होतो. सर्व उपास्य दैवते ही एकच आहेत. कोणत्याही प्रकारे मनोभावे उपासना केली तरी चालते असा धार्मिक संदेश या प्रहसनातून मिळतो. विसाव्या शतकात सुरू असलेल्या दैवत पूजन भेदावर हे कथानक आधारित आहे.

**निष्कर्ष** :-

धर्म या मुद्यावर अजुनही भारतात वाद होतात. एकमेकांचा जीव घेण्यासाठी हा एक मुद्दा पुरेसा ठरतो, अशी परिस्थिती एकीकडे असताना सलोखा, बंधुभाव ही तत्त्वेही भारतात आहेत.

या मुद्यावर विश्लेषण करत असताना श्री. जीव यांनी पौराणिक ते आधुनिक सर्व कालखंडातील कथानके घेऊन त्या त्या काळातील सामाजिक परिस्थितीचे उत्तम विवेचन केले आहे.

धर्म ही कोणत्याही काळातील महत्त्वाची बाब आहे. परंतु केवळ पुरातन काळात सांगितलेल्या गोष्टींचा विचार न करता आधुनिक युगाप्रमाणे विचार करायला व वागायला शिकले पाहिजे. जुन्या कालबाहय रूढी, प्रथा यांचा त्याग केला पाहिजे, असा निष्कर्ष या मुद्याचा अभ्यास करताना समोर येतो.

३) **आर्थिक** :-

समाजातील गरजांच्या पूर्ततेसाठी समाजाने ज्या आर्थिक क्रिया मान्य केलेल्या असतात त्यातून समाजातील घटकांचा आर्थिक दर्जा दिसून येतो. दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी पैसा हा अत्यावश्यक घटक आहे. समाजात पूर्वी वस्तूच्या बदल्यात वस्तू असा विनियम केला जात असे. परंतु सध्याच्या युगात वस्तूचा मोबदला पैशाच्या स्वरूपात चुकता केला जातो. जागतिकीकरणामुळे विनिमय करण्यासाठी वेगवेगळया राष्ट्रांची वेगवेगळी चलने अस्तित्वात आली. समाजात संपत्ती मग ती दागदागिने, पैसे, जमीन जुमला, घरदार या कोणत्याही स्वरूपातील असो. त्या संपत्तीच्या जोरावर त्या व्यक्तीची समाजातील पत ठरत असते.

कौटुंबिक स्थैर्य हे कुटुंबातील घटकांच्या संख्येवर व त्यांच्या आर्थिक मिळकतीवर अवलंबून असते. जर कुटुंबातील फक्त कर्ता पुरूष कमावता असेल आणि त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींची संख्या जर जास्त असेल तर कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची होते. यातूनच ओढाताण, राग, द्वेष, लोभ, मत्सर यांचा जन्म होतो. श्री. जीव यांनी आपल्या विवाहविडम्बनम्, दरिद्रदुर्दैवम्, चौरचातुर्यम्, क्षुतक्षेमीयम्, चिपीटकचर्वणम् या प्रहसनांमधून समाजातील अशा पैलूंवरही प्रकाशझोत टाकत आहे.

१) **विवाहविडम्बनम्** :-

रतिकांत या आर्थिक दृष्टया सुसंपन्न असलेल्या साठवर्षीय विधुराच्या पुनर्विवाहाचे हे कथानक आहे. या प्रहसनात केवळ पैशाच्या जोरावर समाजातील गरीब व गांजलेल्या वधूपित्यांना नाडणाऱ्या, त्यांचा वापर करून घेणाऱ्या रतिकांत सारख्या व्यक्ती या समाजात असतात.

घटक (मध्यस्थ) ही व्यक्ती देखील केवळ पैशासाठी काम करताना दिसते असे प्रथम वाटते. परंतु शेवटी मात्र तो त्या गरीब, उपवर कन्येचा विवाह तिच्या योग्य अनुरूप वराशी लावून देतो. यासाठी तो रतिकांत कडील धन व स्वतःची बुद्धी यांचा वापर करतो. पैशाच्या झगमगाटामुळे त्याला योग्य अयोग्य, हेही समजेनासे झाले आहे. रतिकांतही मागेल तेवढे पैसे त्याला देऊन लग्न जमवण्यास तयार आहे. घरातील नोकरही पगारवाढ होण्याच्या आशेने रतिकांतला मदत करत आहे. पगारवाढ करण्याची लालूच दाखवून रतिकांत त्याला वापरुन घेत आहे.

कङ्क । त्वं मे पुत्रस्थानभूतो भृत्योऽसि । [८]

समाजातील गरीब वर्गातील माणसांना पैशाच्या मोहापायी वाईट व अवैध कृत्येही करण्यास भाग पाडणाऱ्या धनिकांची वृत्ती या प्रहसनातून दिसून येते.

१) **दरिद्रदुर्दैवम्** :-

या प्रहसनात वक्रेश्वर नामक ब्राह्मण त्याची पत्नी लंबोदरी आणि त्यांची मुले या दरिद्री कुटुंबाची कथा सांगितली आहे. त्याच्या स्वार्थी वृत्तीमुळे त्याला आपली

आर्थिक स्थिती सुधारण्याची संधी मिळूनही ती तो सुधारू शकत नाही. या प्रहसनाचे कथानक मध्ययुगीन असल्याचे जाणवते.

प्रहसनाच्या सुरुवातीलाच ब्राह्मण वक्रेश्वर शर्मा यांचे दारिद्रयाने पीडित असे वर्णन केले आहे.

"छिन्न -कर्पट, छिन्न - पादुक, छिन्नातपत्र ।

छिन्न छत्रं छिन्ने पादुके,भूतलं ज्वलदग्नितुल्यं चरणो मे निपीडयति" [९]

असे त्याचे वर्णन आहे. मिळालेल्या भिक्षेत उदरनिर्वाह होत नसल्याने ब्राह्मण कुटुंबासह भिक्षाटनाला बाहेर पडतो. त्याच्या पुत्राला वाटेत तहानेने व्याकूळ होऊन चक्कर येते. तेथे पाणी आणण्यासाठी जाताना त्याला एक साधू दांपत्य भेटते ज्यांच्यापाशी शिवपाश आहेत. त्यापासून आपले दारिद्रय दूर करण्यासाठी तो ब्राह्मण घेतो परंतु त्या पाशात असेही सामर्थ्य आहे की ज्यामुळे त्या अवस्थेतील सर्वांच्या गरजांची पूर्तता होते. हे समजल्यानंतर त्याला हे सहन होत नाही.

अन्धः कुष्ठी दरिद्रो वा प्रतिवेशीवरं भवेत् ।

समानधनवर्गेण स्पर्धमानो हि दुःसहः ॥ [१०]

ईर्ष्येने तो सर्वांना दरिद्री बनवू इच्छितो. साधूला हे समजल्यामुळे तो वक्रेश्वराकडून ते पाश काढून घेतो आणि वक्रेश्वराचे कुटुंब पुन्हा दारिद्रयाच्या खाईत लोटले जाते.

या प्रहसनात ब्राह्मणाची खालावलेली आर्थिक स्थिती, मिळालेल्या भिक्षेतून स्वतःसाठी राखून ठेवण्याचा त्याचा स्वार्थ, दारिद्रयाला आणि ओढगस्तीला कंटाळलेली त्याची पत्नी यांचे चित्रण केले आहे. वक्रेश्वराच्या दारिद्रयामुळे त्याच्या वृत्तीवरही परिणाम झाला आहे. ब्राह्मणाला उचित अशा उदारवृत्तीचा ऱ्हास झाला आहे. यामुळे स्वार्थी, लोभी आणि मत्सरी झालेल्या वक्रेश्वराच्या दुर्दैवाची ही कथा आहे.

या कथेतील वक्रेश्वराच्या दारिद्रयाचे कारण त्याने धनिकांची कंजूष वृत्ती असे सांगितले आहे.

पुरवासिनां धनिना प्रतिगृह पर्यटन्नपि न लभेऽभिलाषानुरुपां भिक्षाम् ।

धिक् धनिकगृहस्थान ।

लौहस्वभावे दृढबद्धमुष्टिः कोषस्थिति कामयते प्रकामम् ।

कृपाणरूपः कृपणो धनाढयः कृपाविहीनो नृषु तीक्ष्णवृत्तिः ॥ [११]

समाजात धनिक आणि दरिद्री असे दोन स्तर आहेत. धनिकांनी उदारवृत्ती दाखवावी तरच दरिद्री माणसांची गरीबी दूर होईल. परंतू एकुण कथानकाचा सारांश असा निघतो की दरिद्री माणसांनी स्वार्थ व ईर्ष्या दूर सारून आपल्या सारख्या इतरांचेही दारिद्रय दूर होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

२) **चौरचातुरियम्** :-

श्री. जीव यांचे हे दोन अंकी प्रहसन असून त्यामधे चोरीच्या विविध अंगांचे परीक्षण त्यांनी केले आहे.

घटंकर नावाचा चोर चोरी करून संपत्ती घेऊन जात असताना त्याला तीन पोलीस पकडण्यासाठी येतात परंतु एकासमोर तो अंध असल्याचे नाटक करतो.

नेत्रहीनस्य मे यथा दिवा तथा रात्रिः। [१२]

तर दुसऱ्यासमोर वेडा असल्याचे नाटक करतो. तिसऱ्याला लाच देण्याचा प्रयत्न करतो पण तो सफल न झाल्याने त्याच्या डोळयात धूळ फेकून तो नाहीसा होतो. आपल्या या प्रयत्नांची बढाई तो मारू लागतो.

आपल्या पत्नीला तो सर्व संपत्ती घेऊन बाहेरगावी पाठवून देतो पण वाटेत तिला लुटणाऱ्या चोराला पोलीस पकडतात. त्याच्या घरी भिक्षा मागायला आलेल्या संताला पोलीस चोर समजून पकडतात व नंतर सोडून देतात. घटंकराचा उद्धार करण्यासाठी तो संतपुरुष त्याच्याकडून खरे बोलण्याचे व नियमित देवदर्शनाचे वचन घेऊन त्याला रूपपरिवर्तिनी विद्या देतो. या विद्येच्या सहाय्याने तो राजाचा घोडा चोरूनही सहीसलामत सुटतो. राजाला हे रहस्य सांगताना तेथे त्याचे गुरू आल्यावर तो त्यांना आपले प्राण दक्षिणा म्हणून देतो. साधूच्या सांगण्यावरून राजा त्याला क्षमा करतो व त्याच्या उपजीविकेची व्यवस्था करतो.

या कथानकात एका चोराच्या जीवनातील पूर्ण परिवर्तनाची कथा सांगितली आहे. सत्यवादीपणामुळे त्याची शिक्षा माफ होऊन उपजीविकेची सोयही होते.

आर्थिक स्तरावर विषमता असल्यामुळे आणि उपजीविकेचे साधन नसल्यामुळे मनुष्य चोरीस प्रवृत्त होतो. यामधे चोर ही व्यक्ती नसून प्रवृत्ती आहे आणि समाजाने उदारमनाने त्या प्रवृत्तीचा नाश करून त्यांना सुधारण्याची संधी दिली पाहिजे असा या प्रहसनाचा हेतू दिसून येतो.

घटंकर प्रथम चोर असताना त्याला आपल्या कृत्याची लाज वाटत नाही. उलट फसवण्याच्या आपल्या क्लृप्त्यांचे तो समर्थन करतो व बढायाही मारतो.

विद्या नास्ति न चारूधीर्न च मया कारू: कला शिक्षिता । [१३]

परंतु साधूपुरुषामुळे त्याच्यात आमूलाग्र परिवर्तन होते. योग्य संधी मिळाल्यास प्रत्येक जण आपली पात्रता सिद्‌ध करू शकतो हे या प्रहसनावरून दिसून येते.

३) **क्षुतक्षेमीयम्** :-

श्री. जीव यांच्या प्रहसनाचे हे कथानक पौराणिक असून त्यामधे यमराजाचा कर्मचारी चित्रगुप्त याने पृथ्वीवर आल्यानंतर रंगनाथ नामक एका कंजूष सावकाराच्या घरी जाऊन घेतलेला पाहुणचार. त्याबदल्यात त्याने त्याला सांगितलेले गुप्तधनाचे साठे इ. चे वर्णन आहे.

खरे तर आलेल्या अतिथीचे देव म्हणून स्वागत करणे आणि त्याचा पाहुणचार करणे ही भारतीय संस्कृती आहे. परंतु रंगनाथ सावकाराला मात्र पैसे खर्च होण्याच्या भीतीने कोणालाही दारात उभे करणेही नको वाटते. तो सरळ त्याला धर्मशाळेचा रस्ता दाखवतो. त्याच्या घरातील नोकरही मालकाच्या भीतीने दरवाजा उघडताना संताप व्यक्त करतात.

अत्र पिपीलिका प्रवेशोऽपि नास्ति ।

कुक्कुरोऽपि तावदितो रोदनं कृत्वा प्रतिनिवर्त्तते । [१४]

ज्योतिषविद्या जाणत असल्याचे सांगितल्यामुळे चित्रगुप्ताला त्या घरात प्रवेश मिळतो व पाहुणचाराच्या बदल्यात घरातील गुप्तधन संचय कोठे आहे ते सांगावे लागते.

घरात गुप्तधन असल्याचे समजल्यानंतर रंगनाथ भयभीत होतो कारण धन मिळणाऱ्यांचे आयुष्य कमी असते हे त्याला माहीत आहे. या भीतीने तो त्याला आयुष्याबाबतही विचारतो.

तत्र निधिरूपेण यद् वर्त्तते मदीय गृहे तदवार्त्तया भीतोऽस्मि ।

श्रूयते निधिलाभो भवति प्रायो हीनायुष्काणाम् । कथयतां

मदीयमायुष्परिमाणम् भोगादृश्टञ्च की दृशम् । [१५]

अल्पायू असल्याचे सांगून आयुष्य वाढवण्यासाठी गरीबांची घरे गवताने शाकारून देण्याचे सांगून चित्रगुप्त निघून जातो. रंगनाथाचा एक वर्षाने मृत्यू झाल्यानंतर यमराजासमोर चित्रगुप्त त्याचे पुण्य सांगतो व रंगनाथाला शिंकण्याची युक्ती सांगितल्यामुळे यमराज त्याला 'जीव - जीव' असे म्हणतो. त्याचा अर्थ त्याची आयुष्यवृद्धी होणार आहे असा काढत त्याला पृथ्वीवर परत पाठवण्यात येते.

उत्तम आर्थिक स्थिती असूनही गरीबांना मदत न करता कंजुषपणाने धन साठवून ठेवणारा रंगनाथ आयुष्य वाढवण्यासाठी जवळचे धन खर्च करण्यासाठी कसाबसा तयार होतो. आर्थिक लाभाच्या लोभाने त्याचे सेवकही चित्रगुप्ताकडून ज्योतिष जाणून घेण्यासाठी धडपडतात. समाजातील लोभी धनिकांचे चित्र श्री. जीव यांनी व्यवस्थित साकारले आहे. तसेच कंजूष असलेल्या आपल्या मालकाकडे गुप्तधन आहे असे समजल्यावर त्याचे सेवकही चित्रगुप्ताला हाताशी धरून मालकाचे धनहरण करू पाहतात. नोकरांशी व्यवस्थित न वागणाऱ्या मालकाबद्दल नोकरांच्या मनात काय भावना असतात हे या घटनेवरून समजते. धनाच्या आशेनेच प्रत्येकजण दुसऱ्याशी चांगला वागत असतो हे येथे दाखवून दिले आहे.

४) **चिपीटकचर्वणम् :-**

कपाली नामक लोभी कंजूष माणसाच्या वृत्तीचे वर्णन या प्रहसनात केले असून त्याच्या अतिकंजूषवृत्तीमुळे त्याच्या घरातल्यांना होणाऱ्या त्रासाचेही येथे वर्णन केले आहे. आपल्या नोकराने जुनी, फाटकी छत्री फेकून दिली या कारणावरून तो फास लावून घेण्याची तयारी करतो. यावरून त्याची कृपणवृत्ती दिसून येते.

अहमुदबन्धनेन प्राणांस्त्यक्ष्यामि, न शक्ष्यामि गृहेऽस्मिन्नवस्थातुम् ।

मम महामूल्यं छत्रमिदम् पथि विनिक्षिप्तम् । [१६]

स्वतःच्या जुन्या फाटक्या चपला नोकरांनी बाहेर फेकून दिल्या आणि त्या एका कुत्र्याने पळवून नेल्या असे समजताच तो हातातील काम सोडून कुत्र्यामागे लागतो आणि त्या कुत्र्याकडून चावा घेतल्याने रक्तबंबाळ होतो.

आलेल्या वैद्याने जास्त खर्चिक उपाय सांगितल्यामुळे तो पिसाळल्याचा अभिनय करून त्याला पळवून लावतो.

वैद्य :- को दास्यति मे मुद्राचतुष्टयं दक्षिणाम् ?

कपाली (कुक्कुरशब्दं कृत्वा नखदन्तेनाक्रमितुं चेष्टते ।) [१७]

त्याची पत्नी रंगिणी तांत्रिकाला बोलावते. शेजाऱ्यांच्या सांगण्यानुसार तांत्रिक त्याला उपाय सांगतो की सर्वांनी तीन महिने केवळ चिवडयावर निर्वाह करावा आणि कपाली बचत होणार या विचाराने खूष होतो.

केवलं चिपीटकचर्वणं कुर्वीत गृहजनः। [१८]

रंगिणी आपण या व्रताचे पालन करणार नसल्याचे सांगून निघून जाते. तांत्रिकाने कार्य पूर्ततेसाठी अनुष्ठान करताना कपालीला तांब्यात शेवटी शून्य असलेल्या संख्येइतके सोने टाकण्यास सांगितले. नाईलाजाने तो त्यात १० तोळे सोने टाकतो. तांत्रिक त्याला झोपेचे औषध देऊन ते सोने काढून रंगिणीला देतो. कपालीला तांत्रिक असे सांगतो की नोकराच्या स्पर्शाने ते सोने नष्ट झाले.

तव दासेन पादुकारोपणेन पूजाद्रव्यं सर्वविनाशितम् ।

सुवर्णमपि द्रवीभूतम् । [१९]

रंगिणी व्रतासाठी तयारी दर्शवत असल्याचे पाहून कपालीला अनुष्ठानाचा परिणाम झाल्याचे वाटून आनंद होतो.

आर्थिक स्थिती संपन्न असूनही जुन्या चपला आणि फाटकी छत्री यासाठी जीव द्यायला निघणाऱ्या धनिकाचा कंजूषपणा या प्रहसनातून दाखवला आहे. कपालीचा कंजूषपणा इतका पराकोटीला पोहोचला आहे की तो त्याच्या पत्नीच्या वाटयालाही पैसे येऊ देत नाही. इतक्या संपन्न घरात राहूनही तिला पैसे मिळवण्यासाठी तांत्रिक

आणि शेजाऱ्यांची मदत घ्यावी लागते. स्त्रीचे आर्थिक बाबतीतील परावलंबित्व येथे दिसून आले आहे.

काटकसरीपणा हा गृहव्यवस्थेचा आवश्यक भाग आहे परंतु त्याचा अतिरेक करणेही हास्यास्पद ठरू शकते. तांत्रिकाच्या म्हणण्यानुसार सर्वांनी केवळ चिवडा खाऊन राहणे हेही अतिरेकी वाटते. समाजात राहण्यासाठी समाजातील इतर घटकांचा विचार करणेही आवश्यक आहे. परंतु कपालीसारखे महाभाग जेव्हा आपल्यावर उपचार करायला आलेल्या वैद्यालाही पळवून लावतात तेव्हा केवळ आत्मकेंद्रित वृत्ती दिसून येते. तसेच स्वतःच्या जीवापेक्षाही जास्त संपत्ती सांभाळण्याची वृत्ती दिसून येते.

तांत्रिकासारखी व्यक्ती जिच्याकडे अडलेल्या, गरजू माणसाला लुबाडण्याची वृत्ती असते तीच व्यक्ती रंगिणीची मदत करताना दिसून येते. येथे या व्यक्तीबाबतचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होते. कपालीचा सोने अधिकाधिक मिळवण्याचा हव्यासही दिसून येतो. या प्रहसनामधे संपत्तीच्या अतिहव्यासापायी शेवटी तोटा सहन करावा लागतो हे दाखवण्यात आले आहे.

**निष्कर्ष** :-

समाजातील पूर्वीची वर्णव्यवस्था म्हणजे ब्राम्हणांनी विद्यादान करणे, क्षत्रियांनी संरक्षण करणे, वैश्यांनी व्यापार करणे इत्यादी सर्व मोडीत निघाले आहे. सध्या समाजातील व्यक्तीची बौद्धिक, शारीरिक कुवत पाहून तिला काम दिले जाते. यामुळे पूर्वापार चालत आलेली अर्थव्यवस्थाही बदलली अहो. २० व्या शतकातील या बदलांचे चित्रण श्री. जीव यांच्या लेखनात काही प्रमाणात दिसून येते.

लोकसंस्कृती :-

संस्कृती हे मानवसमाजाचे वैशिष्टयपूर्ण लक्षण आहे. मानवसमाजाची संपूर्ण व्यवस्था संस्कृतीवरच अवलंबून आहे. मानवास संस्कृतीचा निर्माता म्हणतात. मानव

समाज हा निसर्गातून नववातावरणाची निर्मिती करत असतो. त्यालाच संस्कृती असे म्हणतात.

कोणतीही व्यक्ती जन्माला आल्यानंतर ती ज्या समाजात राहते, वावरते त्या सामाजिक वातावरणाचा प्रभाव तिच्यावर पडत असतो. समाजात ज्या प्रकारे व्यवस्था असते त्याप्रकारे त्या व्यक्तीचे आयुष्य घडत जाते. प्रत्येक मनुष्याच्या जडणघडणीत समाजाचा मोठा वाटा असतो. समाजातील जाती व्यवस्था, धर्मव्यवस्था यामुळे समाजात वेगवेगळे समूह निर्माण होतात. या प्रत्येक समूहाची आपली अशी एक संस्कृती असते. वेगवेगळया समूहांच्या एकत्र येण्याने त्या संस्कृतीचा संकरही होतो. या संस्कृतीला लोकसंस्कृती असे म्हटले जाते. बोलीभाषा एक असलेल्या समाजातही वातावरणाच्या बदलामुळे भिन्न संस्कृती आढळते. प्रत्येक संस्कृतीमधे स्वतःचे सणवार, रीतिभाती, चाली, प्रथा, परंपरा असतात. या लोकसंस्कृतीचा परिणाम शिक्षणापेक्षाही अधिक आढळतो.

समाजात आर्थिक पातळीनुसार देखील काही वर्ग असतात. त्यांच्यावर त्यांच्या जीवनपद्धती, चालीरीती यांचाही प्रभाव पडतो. एखादा सण, उत्सव साजरा करण्याच्या पद्धतीही बदलतात. समाजात मनोरंजन करण्याचेही अनेक प्रकार आहेत. लोकसंस्कृतीचा प्रभाव मनोरंजनावरही दिसून येतो.

श्री. जीव यांच्या लेखनातून समाजातील लोकसंस्कृतीचाही विचार करण्यात आलेला आहे. त्यांच्या १५ प्रहसनांपैकी विवाहविडम्बनम्, रागविरागम्, विधि विपर्यासम् ही प्रहसने ही लोकसंस्कृतीवरच आधारित आहेत. त्यांच्या लेखनातून जरठ-बाला विवाह, लोकरंजन, समाजातील श्रद्धा, अंधश्रद्धा यांच्यावर प्रकाशझोत टाकला गेला आहे.

१) **विवाहविडम्बनम्** :-

संपूर्ण हिंदू समाजातील वाईट चालीरीतींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या प्रहसनातून करण्यात आला आहे. केवळ पैशाच्या जोरावर समाजातील एका गरीब,

निर्धन पण सुंदर मुलीशी लग्न करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या एका वृद्ध, धनाढ्य व्यक्तीविषयी हे प्रहसन लिहिण्यात आले आहे.

केवळ पूर्वीच्या काळीच नव्हे तर या काळातही संपत्तीच्या जोरावर असे प्रकार बरेच ठिकाणी अजूनही चालू आहेत. विधुर असलेल्या रतिकांत नामक संपन्न साठ वर्षीय वृद्ध आपल्या पुनर्विवाहासाठी प्रयत्न करत आहे. त्यात त्याची मदत करण्यासाठी त्याने घरच्या नोकराला वेठीला धरले आहे.

कङ्क । त्वं मे पुत्रस्थानभूतो भृत्योऽसि । [२०]

त्याच्या बहिणीच्या उपरोधात्मक बोलण्याकडेही तो दुर्लक्ष करतो.

पलितकेशस्य गलितदन्तस्य लुलितगात्रस्य स्थविरस्य विवाहाय घटकयोजनाम् । [२१]

विवाह जमवणारा मध्यस्थ (घटक) हा ही त्याला सामील आहे. हा मध्यस्थ भेटण्यासाठी घरी आल्यानंतर नोकराच्या मदतीने जे स्वतःचे प्रसाधन करवून घेतो ते अतिशय हास्यास्पद दिसते.

वास्तविकपणे मध्यस्थ हा अतिशय लोभी आहे असे प्रथमदर्शनी वाटते. विवाहातील विविध खर्चांच्या बहाण्याने तो रतिकांत कडून भरपूर पैसे उकळतो. आपल्याला फसवले जात आहे याबाबत रतिकांत अनभिज्ञ आहे. मध्यस्थ त्याच्याकडून पैसे घेऊन त्या गरीब उपवर मुलीचा विवाह तिच्या अनुरूप एका तरूणाबरोबर लावून देतो आणि रतिकांतला मात्र हात चोळत बसणेच नशिबी येते.

समाजात असे कित्येक वधुपिते आहेत ज्यांच्याकडे केवळ हुंडा देण्यासाठी पैसे नसल्यामुळे त्यांच्या सुंदर उपवर मुली बिनलग्नाच्या राहतात. हुंडा देणे व घेणे ही समाजातील एक वाईट रूढी आहे ज्याच्या बळी अनेक मुली ठरल्या आहेत आणि ठरत आहेत. अशा समाजातच अशा वधुपित्यांच्या अडचणीचा फायदा घेणारे रतिकांत सारखे अनेक संपन्न वृद्ध आहेत. समाजातील अशा वाईट प्रथांचे उच्चाटन समाजातील सेवाभावी वृत्तीच्या व्यक्तींकडूनच होऊ शकते.

प्रदेश विशेषे वरवधूनिर्वाचनपूर्वक विवाह घटको घटकपदेनाभिधीय । [२२]

घटक (मध्यस्थ) ही व्यक्तिरेखा प्रथम अतिशय लोभी आणि लाळघोटेपणा करणारी रेखाटलेली असली तरी नंतर असे लक्षात येते की ही व्यक्ती समाजाच्या

भल्यासाठी काम करणारी आहे. रतिकांतकडून विविध मागण्यांसाठी पैसे घेऊन हा मध्यस्थ एका गरीब व अडचणीत आलेल्या वधूपित्याची मदत करतो आणि सुयोग्य तरूणाबरोबर चंद्रलेखेचा विवाह लावून देतो.

रतिकांतची बहीण असलेल्या खड्गधारा या स्त्रीच्या माध्यमातून देखिल समाजमनाचे दर्शन होते. स्वतः विधूर असलेला रतिकांत विवाहासाठी निघताना आपल्या या विधवा बहिणीचे मुखदर्शनही अशुभ मानतो.

त्वमिदानीं गृहाभ्यतरं गच्छ । विधवा मुखदर्शनं यात्राभङ्गाय भवति । [२३]

यावरून स्त्रीला दुय्यम ठरवणारी समाजाची मानसिकता लक्षात येते. या प्रहसनाद्वारे समाजातील अनेक वाईट प्रथा, चालीरीती, अंधश्रद्धा यांचे दर्शन घडवण्यात आले आहे. परंतु फसवणूक करून समाजाचे भले करू इच्छिणाऱ्या घटका-(मध्यस्थ) सारख्या व्यक्तीने मात्र असे वागणे मनाला न पटणारे आहे. विवाहसंस्थेत मध्यस्थ ही व्यक्ती वधू व वर या दोन्ही बाजूंना विश्वसनीय वाटली पाहिजे नाहीतर त्यावरचा विश्वास उडून जाण्यास वेळ लागत नाही.

२) **रागविरागम्** :-

श्री. जीव यांनी लिहिलेल्या या एकांकी प्रहसनात जीवनातील सगिताचे महत्त्व वर्णन केले आहे.

एका संगीत द्वेषी राजाच्या सभेतच नव्हे तर संपूर्ण राज्यात संगिताला बंदी आहे. लपूनछपून करमणूक करणाऱ्यांना सुद्धा पकडले जाते. अशातच एक साधू गाणे म्हणत असताना त्याला पकडण्यासाठी सैनिक त्याच्यामागे पळत सुटतात. त्यातील एक धडकून बेशुद्ध पडला असता एका दंपतीच्या गाण्याने तो शुद्धीवर येतो. त्या राजाच्या राज्यातील प्रजा देखील या संगीतबंदीला कंटाळून त्याचा द्वेष करत आहे. सैनिकही त्याच्याविरुद्ध उठाव करतो.

'संगीतरस-विद्वेषी राजा भवति राक्षसः।

तद्वधाय यतिष्येऽहं छलेन च बलेन च ॥'[२४]

राजा मात्र सर्व कला या केवळ धनाचा अपव्यय करतात अशा मताचा आहे. त्याच्या राज्यात त्याला केवळ सैनिक हवे आहेत ज्यांच्या शक्तीमुळे तो आपले राज्य वाढवू शकतो व सुरक्षित ठेवू शकतो.

राजसन्तोषाय प्रत्यह बहवो युवानः सेनापतिपदमङ्गीकृत्य जीविकासमाधानं कुर्वन्ति, विनायासं भोजनशय्या परिच्छदांश्च लभन्ते । [२५]

उपजीविकेसाठी सैन्यात भरती होणे हे त्याच्या राज्यातील तरूणांचे ध्येय आहे. शक्ती आणि धन याशिवाय कशालाही महत्त्व देणे त्याला योग्य वाटत नाही.

अशा राजाच्या राज्यात त्याचा मित्र त्याला प्रजेच्या नाराजीबद्दल सांगून एका तरूण दांम्पत्याला सभेत गाण्याची परवानगी मागतो. राजा मनाविरूद्ध अनिच्छेने अशा अटीवर गाणे कबूल करतो की त्याच्या परवानगीशिवाय कोणीही त्यांना बक्षीस देऊ नये.

'मदाज्ञां विना यदि कश्चिदुपहारमर्पयेत् स दण्डनीयो भवेत् ।' [२६]

दाम्पत्याने सभेत गाणे म्हटल्यानंतर प्रभावित होऊन यती, राजकुमार व राजकुमारी त्यांना बक्षीस देतात. राजा रागाने त्यांना असे करण्याचे कारण विचारतो. यती असे सांगतो की संन्यास धर्माला कंटाळून तो गृहस्थधर्म स्वीकारणार होता पण त्या युवा कलाकारांमुळे तो या विचारापासून विरक्त झाला.

'यतिधर्म क्लेशकरंनिर्णीय पुनः संसारपथं प्रवेष्टुमैच्छम् ।' [२७]

राजकुमार राजाच्या वर्तनाला कंटाळून त्याचा वध करण्यास उद्युक्त झाला होता पण तोही या विचारापासून दूर गेला.

'विवेकद्वन्द्वमनुभूयापि सहचराणामुत्तेजनया हत्या कर्मणि कृतनिश्चय आसम् ।' [२८]

राजकुमारीच्या वाढत्या वयाचा विचारही न करता राजा तिच्या लग्नाबाबत उदासीन होता परंतु ती स्वतः यामुळे मंत्रीपुत्रासोबत पळून जाण्याच्या विचारात होती. तीही गाण्यामुळे या विचारापासून परत फिरली.

'मन्त्रिपुत्रेण सहाद्यैव देशान्तरगमनमवधारितं मया ।'[२९]

राजाला हे सर्व समजताच राजाला आयुष्यातील संगीताचे महत्त्व पटले त्याने त्यांना बक्षीसासोबत सुवर्णमुद्राही दिल्या. तसेच राज्यातील संगीतावरील बंदीही उठवली. या प्रहसनामधे लोकसंस्कृतीविषयक अनेक मुद्दे लक्षात येतात.

सामान्य जनतेला काम झाल्यानंतर मनोरंजन आवश्यक असते. श्रमानंतर तोच त्यांचा विसावा असतो. या मनोरंजनावर राजाने बंदी घातल्याने जनता राजाचा द्वेष करू लागली आहे. राजाच्या आज्ञेविरुद्ध जाऊन लोक लपूनछपून का होईना स्वतःचे मनोरंजन करून घेत आहेत यावरून जनतेचे संगीतावरील प्रेम लक्षात येते. तरूण दाम्पत्याच्या गायनाने जेव्हा सैनिक शुद्धीवर येतो तेव्हा त्यालाही संगीताचे महत्त्व पटते आणि तोही राजाच्या आज्ञेचा निषेध करतो. सर्वसामान्य जनतेला राजा विश्वासार्ह वाटायला हवा. तसा तो येथे नाही. हिंदू धर्मानुसार साधू किंवा यती यांनी संन्यासधर्म सोडून गृहस्थाश्रमात प्रवेश करणे निषिद्ध मानले आहे. ही परंपरा पूर्वापार चालत आली आहे. या परंपरेला सोडून प्रहसनातील यती संन्यासधर्म सोडून गृहस्थाश्रमाची वाट चालत आहे.

राजाने आपला वारस राज्यकारभार करण्यायोग्य झाल्यानंतर त्याच्या हाती राज्यकारभार सोपवून वानप्रस्थाश्रम स्वीकारणे ही राजधर्माची परंपरा आहे. परंतु या प्रहसनातील राजा मात्र आपली निवृत्ती स्वीकारायला तयार नाही आणि राजकुमाराच्या हाती राज्य सोपवत नाही. राजकुमार या कारणाने उद्विग्न होऊन स्वतःच्या पित्याची हत्या करण्यास उद्युक्त होतो. राजकुमारीचे लग्नाचे वय उलटून चालले असले तरी राजा तिच्या लग्नाचा विचार करण्यास तयार नाही. या लोकपरंपरा आणि रूढी या प्रहसनात दाखवून त्या विरुद्ध बंड करण्याचा प्रयत्न श्री. जीव यांच्या लेखनातून झालेला दिसून येतो.

३) **विधि विपर्यासम् :-**

विधि म्हणजे ब्रह्मदेव किंवा कायदा. या विरुद्ध जाण्याचा प्रयत्न म्हणजे विपर्यास होय. स्त्री आणि पुरुष यांच्यामधे नैसर्गिक असा भेद आहे आणि हे दोन्ही मिळूनच परिपूर्ण समाजाची निर्मिती करणे शक्य आहे. हा फरक न जाणून घेता

दोघांना समान बनवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे विधि - विपर्यास आहे असे करणे हे निसर्ग नियमाविरुद्ध आहे हे या प्रहसनाद्वारे दाखवण्यात आले आहे.

निसर्गनियम तोडून स्त्री पुरुष समानता दाखवणे हे धर्म आणि मानवतेच्या मर्यादांचे लोप करणारे आहे, पतनाच्या दिशेने जाणारे आहे. समाजात अशा प्रकारचे प्रयत्न चालू असताना श्री. जीव यांचे हे प्रहसन देशाच्या सांस्कृतिक जपणुकीचा प्रयास आहे. केवळ आधुनिकता आणि प्रगतपणा दाखवण्यासाठी स्त्रियांना समानतेची वागणूक देणे हे योग्य नाही असे या प्रहसनात दाखवले आहे.

विनोदसुंदर हा तरूण स्त्री पुरुष विषमतेच्या विरुद्ध आहे. त्याचे असे म्हणणे आहे की त्याच्या संपत्तीची वाटणी करताना मुलांबरोबर मुलींनाही समान हिस्सा दिला गेला पाहिजे.

'मम सम्पद्विभागावसरे सर्वसन्तानानां समानांशतां विधास्यामि ।' [३०]

घर्घरकंठा नामक तरूणी या विषयाशी सहमत आहे. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार मिळण्यासाठी दोघेही आयुष्यभर विवाह न करण्याचा निर्णय घेतात.

'विश्वसमाजहित चिन्तयते मे परिणयोऽपि न रोचते ।' [३१]

त्याच्यामते वधूपरीक्षा, विवाहबंधन इ. मुळे स्त्रियांना बंधनात अडकावे लागते. स्त्रियांना पुरुष करणे, स्त्रीशिवाय संतानोत्पत्ती इ. विषयांवर दोघांचे वाद होऊन विनोदसुंदर आपल्या मताच्या समर्थनासाठी वेदपुराणातील दाखले देतो.

पुरुष एवेदं सर्व यद् भूतं यच्च भाव्यम् ।

भूतमध्ये मादृशां भाव्यमध्येच त्वादृशां सन्निवेशः। [३२]

घर्घरकंठा मात्र विज्ञान हे पुरुषांच्याबाबत पक्षपाती असल्याचे सांगून सर्व पुरुषांना स्त्री बनवण्याचा विचार करते. हे ऐकून स्त्री ही अबला असल्याचे विनोदसुंदर वादात प्रतिपादन करताना महिला परिषदेची जंबालजिनी ही तिच्या मदतीला येते. ती स्त्री पुरुष समतेसाठी दहा सूत्री योजना सांगते.

या प्रहसनात असे अनेक प्रसंग घडतात जेथे समतेच्या नावाखाली स्त्री पुरुष यांच्यात वाद होतात. एक नपुंसक त्या दोघांपाशी येतो व संरक्षणाची मागणी करतो. एक शल्यचिकित्सक त्याला शस्त्रक्रियेद्वारे पुरुष करण्याच्या तयारीत आहे पण तो स्वतः नपुंसक समाजाचा नेता असल्याने त्याला हे मान्य नाही. शल्यचिकित्सक त्या दोघांकडे मदतीची मागणी करत असताना त्याला समजते की हे दोघे आजन्म अविवाहित राहणार आहेत. तो त्यांच्यापैकी एकाच्या प्रजनन अंगाची मागणी करतो.

अनुमन्यतां प्रथमं भवतोरावश्यकाङ्गकर्तनं ततो नपुंसकाङ्गयोजनम् । [३३]

त्यावेळी भयभीत झालेले दोघे विवाहित असल्याचे सांगतात. यावेळी विनोदसुंदर आणि घर्घरकंठा यांना आपले विचार भ्रामक असल्याचे पटते व दोघे विवाहबद्ध होण्याचा निर्णय घेतात. त्यावेळी त्यांना विवाहासाठी हे सर्व नाटक रचल्याचे समजते.

या प्रहसनामधे लेखकाची दृष्टी रूढी-परंपरावादी आणि बुरसटलेली जाणवते. सध्याच्या २१ व्या शतकात विवाह बंधन आवश्यक मानले जात नाही. Live in relationship वरही माणसांचा विश्वास बसत आहे. अशावेळी केवळ विवाह, संतानोत्पत्ती, कुटुंब व्यवस्था पाहणे हेच स्त्रीचे काम आहे असे लेखकाचे म्हणणे आहे. हिंदू संस्कृतीतही पूर्वीपासून ब्रह्मवादिनी स्त्रिया होऊन गेल्या ज्यांनी ब्रह्मचर्य पाळून समाजकल्याणातच आयुष्य व्यतीत केले. विवाह ही आयुष्यातील महत्त्वाची घटना असली तरी ती प्रत्येकाच्याच आयुष्यात आवश्यकच असते असे नाही.

येथे स्वमतप्रतिपादनासाठी विनोदसुंदरने वेद पुराणातील वाक्ये स्वतःच्या सोयीने अर्थ लावून वापरलेली दिसतात तेही न पटणारे आहे. स्त्री व पुरुष यांच्यात शारीरिक भेद असला तरी वैचारिक पातळीवर स्त्री ही पुरुषापेक्षा अधिक खंबीर असते. स्त्रीला समाजात दुय्यम स्थान देणे मनाला पटणारे नाही.

स्त्रियांनी देखील स्वतःच्या हक्कासाठी स्वबळावर लढले पाहिजे. दुसऱ्यांनी आपल्याला अधिकार देण्यापेक्षा ते स्वतः मिळवणे हे जास्त श्रेयस्कर ठरेल. केवळ स्त्रीमुक्ती, समता, स्वातंत्र्य हे वापरातील शब्द न बनता स्त्रियांनी स्वतःच्या कर्तृत्वाने ते सिद्ध केले पाहिजे.

आज जरी सर्वत्र पितृसत्ताक कुटुंबपद्धती रूढ असली तरीही भारतातील काही राज्यात विशेषतः पूर्वेकडील राज्यात आजही मातृसत्ताक कुटुंबपद्धती प्रचलित आहे. यामधे कुटुंबातील ज्येष्ठ स्त्रीकडे कुटुंबाचे सर्वाधिकार असतात.

समाजात स्त्रीला दुय्यम वागणूक मिळते. परंतु स्त्री खंबीरपणे कुटुंब चालवू शकते तसेच ती समाजाचे नेतृत्त्वही करू शकते. परंतु पुरुषांना ते आपल्या अधिकाराचे हनन झाल्यासारखे वाटते. कुटुंबातही पुरुषसत्ताक पद्धती असेल तर स्त्रियांचे साधे हक्कही डावलले जातात. त्यांना हुंडयासाठी, पुत्रप्राप्तीसाठी वेठीस धरले जाते. हे आजच्या आधुनिक युगातील दृश्य आहे. ही परिस्थिती देखील प्रहसनांमधून दाखविण्याचा प्रयत्न श्री. जीव यांनी केला आहे.

**निष्कर्ष** :-

श्री. जीव यांनी लोकसंस्कृतीचा विचार आपल्या लेखनात केलेला आढळतो. हुंडा, पुनर्विवाह, स्त्री - पुरुष समानता, समाजातील बहुजनांचे मनोरंजन इत्यादी विविध मुद्यांवर त्यांनी प्रकाशझोत टाकला आहे.

प्राचीन रूढी, परंपरा याबाबत विचार करताना मात्र त्यांची दृष्टी बुरसटलेली जाणवते. आधुनिक परंपरा त्यांना मान्य नाहीत.

**कौटुंबिक :-**

कुटुंब संस्था ही समाजशास्त्रातील महत्त्वपूर्ण संस्था आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती ही कुटुंबाशी निगडित असते. कुटुंब ही नैसर्गिक, सामाजिक संस्था आहे जेथे मानवाचा जन्म होऊन त्याचा विकास सुरू होतो. ही संस्था मानवी जीवनाचा आणि समाजाचा आधार आहे. मानवाला विकास करून घेऊन समाजात राहण्यायोग्य करण्यासाठी कुटुंबसंस्था आवश्यक आहे.

समाजात एकाच जमातीची अनेक कुटुंबे राहतात. अशा अनेक जमातींचा मिळून समाज बनतो. अशा प्रकारे प्रत्येक कुटुंबात अनेक सदस्य असतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून कुटुंबाचा अभ्यास करताना कुटुंबातील व्यक्ती, त्यांचे परस्पर संबंध, त्यांचे स्वभाव, वैयक्तिक आणि कौटुंबिक चालीरीती या सर्व गोष्टींचा

अभ्यास करणे आवश्यक ठरते. कुटुंबाला समाजात राहावे लागत असल्याने त्यांना काही सामाजिक संकेतांचे पालन करावे लागते. भारत हा जरी विकसनशील देश असला तरी बाकी प्रगत देशांच्या मानाने येथे कुटुंबसंस्था अधिक बळकट आहे. ज्येष्ठांचा आदर करणे, ममता, प्रेम, जिव्हाळा ही कौटुंबिक मूल्ये येथे अधिक प्रमाणात पाळली जातात.

समाजात पूर्वापार एकत्र कुटुंब पद्धती जरी रूढ असली तरी सध्या मात्र उद्योग - व्यवसाय तसेच जबाबदारी या कारणांमुळे विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात येत आहे. प्रत्येक कुटुंबात मर्यादित व्यक्ती असल्यामुळे प्रत्येकावर येणारी जबाबदारी वाढते. कुटुंबात असणाऱ्या ताण-तणावांची विभागणी होत नाही. कौटुंबिक दृष्टिकोनातून श्री. जीव यांच्या प्रहसनांचा विचार करत असताना श्री. जीव यांच्या प्रहसनांमधून दिसणारी कुटुंब व्यवस्था, कुटुंबातील सदस्य, त्यांचे परस्परांमधील संबंध, त्यांच्यातील भावनांची देवाणघेवाण, निर्माण होणारे वाद, वैचारिक मतभेद या सर्व मुद्दयांचा विचार येथे करीत आहे.

१) भट्टसंकटम् :-

भट्टसंकटम् या प्रहसनामधे एक ब्राह्मण आणि त्याची कुरूप, कर्कशा पत्नी यांच्यातील संबंधांचे चित्रीकरण लेखकाने केले आहे. केवळ पतीला यज्ञकर्मासाठी पत्नी आवश्यक आहे म्हणून तो तिला सहन करत आहे. हिंदू धर्म संस्कृतीत जेथे पतीला परमेश्वर मानून पूजा केली जाते तेथे ब्राह्मणपत्नी कामिनी मात्र स्वतःच्या पतीचे तोंड पाहणे हा अपशकुन मानते.

घरातील स्त्री ही त्या घराची खऱ्या अर्थाने स्वामिनी असते. तीच त्या घराचा स्वर्ग किंवा नरक बनवण्यास समर्थ असते. तिच्या वागण्या-बोलण्याने ती पतीचा विश्वास, कामाचा उरक वाढवू शकते. पतीची शक्ती बनू शकते. परंतु कामिनीसारखी स्त्री पतीच्या कामात सहभागी न होता त्याला संसारात दुःख देण्यासच जास्त तत्पर दिसते. अशा पत्नीच्या सहवासात ब्राह्मण दुःखीच असल्याचे जाणवते. परंतु आपल्या पत्नीवर अतिशय प्रेम करणारा ब्राह्मण तिच्या दिसण्यापेक्षा आणि स्वभावापलिकडे

जाऊन तिच्यावर प्रेम व माया करतो. केवळ यज्ञकर्मासाठी आवश्यक आहे म्हणून नव्हे तर पत्नीवरील प्रेमामुळेच तो तिच्यासोबत राहत आहे.

केवळ पत्नीवरील प्रेमामुळेच जेव्हा राजा त्याची पत्नी हरवल्यानंतर त्याला दुसरे लग्न करण्याचा किंवा पत्नीची सुवर्णप्रतिमा तयार करून यज्ञकर्म संपन्न करण्याचा सल्ला देतो तेव्हा ब्राह्मण त्याला नकार देतो. आपल्या राज्याची राक्षसांच्या संकटापासून सुटका तर तो करतोच पण आपल्या पत्नीचा कुरूपपणा घालवून तिला सुंदर करण्यातही यशस्वी होतो.

या प्रहसनामधून श्री. जीव यांनी प्रहसनसाहित्याला एक नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. अश्लीलपणा आणि पारंपरिक दृष्टिकोन यापासून दूर जाऊन त्यांनी रचनात्मकतेने हे प्रहसन लिहिले आहे.

२) विवाह विडम्बनम् :-

विवाह विडंबन हे प्रहसन श्री. जीव यांनी पुनर्विवाह आणि जरठ बाला विवाह या दोन्ही समस्यांचा विचार करून लिहिले आहे. पत्नीचा देहांत झाल्यानंतर जो एकटेपणा जोडीदाराच्या वाटयाला येतो तो जीवघेणा असतो. साठ वर्षीय विधूर रतिकांत हा ही या समस्येमुळे ग्रस्त आहे. जेव्हा दिवसभर काम करून दमून भागून तो घरी येतो तेव्हा त्याच्या हाकेला घरातील नोकर किंवा त्याची बहीण कोणीही प्रतिसाद देत नाहीत. यावेळी त्याची उक्ती त्याच्या एकटेपणाचो जाणीव करून देणारी आहे.

'भार्या विना भान्ति जगन्ति जीर्णान्यरण्यरूपाणि भयस्थलानि ।

भावे च तस्या मरूभूर्विशाला प्रतीयते शीतलचन्द्रशाला ॥'[३४]

याही वयात त्याला केवळ सहचारिणी हवी आहे असे नाही तर षोडशवर्षीय कन्या हवी आहे यावरून याही वयात त्याची कामुकता कमी झालेली नाही हे दिसून येते. त्याला आपला विवाह या शिवाय दुसरी कोणतीच गोष्ट महत्त्वाची वाटत नाही. विवाह जमवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या नोकराला तो पगारवाढीचे आश्वासन देऊन आपल्या अनुकूल करून घेतो. आपल्या वयाचा विचारही न करता रतिकांत

विवाहायोग्य कन्या शोधण्यासाठी मध्यस्थाची मदत घेतो. या वयात एका कुमारिकेशी लग्न केल्यानंतर आपल्या पश्चात त्या मुलीचे काय होईल हा सुज्ञ विचारही त्याने केलेला नाही.

रतिकांतचे त्याच्या बहिणीबरोबरचे संबंधही फार चांगले नाहीत. ती त्याला जेव्हा काही सूज्ञपणाचे सल्ले देते तेव्हा त्याकडे लक्ष न देता तो तिलाच दोष देतो. ती त्याला त्याच्या बाबतीतील सत्य परिस्थिती दाखवू इच्छिते.

पलितकेशस्य गलितदन्तस्य लुलितगात्रस्य स्थविरस्य विवाहाय घटकयोजनम् ।[३५]

या उक्तीवरून देवलांचे संगीत शारदा आठवल्याशिवाय राहत नाही.

म्हातारा इतुका न अवघे पाऊणशे वयमान
दंताजीचे उठले ठाणे नन्ना करीते मान
फुटले दोन्ही कान
लग्नाअजुनी लहान ..... अवघे ......... वयमान

पण तो मात्र तिच्याकडे दुर्लक्ष करून भावी विवाहाच्या तयारीला लागतो. विवाहाच्या वेळी बाहेर पडताना तो तिचे तोंड पाहणेही अशुभ मानतो कारण ती विधवा आहे.

त्वमेव वैधव्यदावदग्धमुखी शृगाली । [३६]

एकूणच रतिकांतचा स्वभाव बाकीच्यांकडे दुर्लक्ष करून स्वतःचे म्हणणे खरे करण्याचा वाटतो तसेच एका सुखाची व नात्याची बांधिलकी बघताना तो इतर नात्यांकडे दुर्लक्ष करत आहे.

कुटुंबात राहताना कुटुंबातील प्रत्येक घटकाशी बांधिलकी असली पाहिजे परंतु येथे दोनच नाती असूनही ती जपली जात नाहीत असे जाणवते.

३) **दरिद्रदुर्दैवम् :-**

एक दरिद्री आणि ईर्ष्या करण्याचा स्वभाव असलेल्या वक्रेश्वर शर्मा नामक ब्राह्मणाची कथा या प्रहसनात वर्णन केलेली आहे. आपल्या स्वभावामुळे तो स्वतःचे व कुटुंबाचे सुख घालवून बसतो.

भिक्षा मागून स्वत:चा व कुटुंबाचा निर्वाह करणाऱ्या ब्राह्मणाला अतिशय कमी भिक्षा मिळाल्यामुळे कुटुंबात वाद होतात. दुसऱ्या दिवशी अधिक अन्न मिळवण्यासाठी तो परिवारासह बाहेर पडतो. तहानेने व्याकूळ होऊन त्याचा मुलगा मूर्च्छित होऊन पडतो. एका सिद्‌ध पुरुषापाशी शिवपाश आहेत ज्यांच्यापासून तो पाहिजे ते करू शकतो. त्याला हे दु:ख न पाहवल्यामुळे तो शिवपाशाच्या सहाय्याने त्या कुटुंबाला पाणी देतो व सर्वांची तहान भागवतो. तेव्हा ब्राह्मण व त्याची पत्नी आपले दारिद्रय दूर करण्यासाठी त्या सिद्‌धाला विनंती करतात. सिद्‌ध त्यांना पाश देऊन त्याचा योग्य वापर करण्याचा सल्ला देतो तसेच असे न केल्यास ते पाश परत येतील असेही सांगतो. तो हे ही सांगतो की जी वस्तू मागाल ती वस्तू आसपासच्या सर्व लोकांनाही मिळेल.

ब्राह्मण अन्न मागण्यासाठी पाशाचा उपयोग करतो तेव्हा त्याची सर्व भिक्षापात्रे अन्नाने भरतातच परंतु अन्य भिक्षुकांनाही पुरेसे अन्न मिळते. हे पाहून त्याच्या मनात ईर्ष्या उत्पन्न होते.

अन्ध:कुष्ठी दरिद्रो वा प्रतिवेशी वरं भवेत् ।

समानधनवर्गेण स्पर्धमानो हि दु:सह:॥ [३७]

त्यामुळे उद्‌विग्न मनस्थितीत तो सर्वांना दरिद्री करण्याची इच्छा व्यक्त करत पाशाचा उपयोग करतो परंतु सिद्‌ध अनुचित उपयोग केल्यामुळे त्याच्याकडून ते काढून घेतो व ब्राह्मणाच्या नशिबी पुन्हा दारिद्रय येते.

या प्रहसनाची पार्श्वभूमी कौटुंबिक आहे. अतिशय गरीब असलेले हे कुटुंब वाईट परिस्थितीचा सामना करते. ब्राह्मणही सर्वांना पुरेसे खायला न घालू शकल्यामुळे मेटाकुटीला आला आहे. त्याही परिस्थितीत तो मिळालेल्या भिक्षेतील वाटा स्वत:साठी काढून ठेवतो. यावरून त्याचा स्वार्थी स्वभाव स्पष्ट होतो. त्याची पत्नी वास्तविक शांत व सुस्वभावी आहे. परंतु ती ही परिस्थितीने त्रासलेली आहे. तसेच पतीच्या वर्तनामुळेही ती कंटाळलेली आहे.

ब्राह्मणाचा स्वभाव परिस्थितीवर मात करण्याचा नाही. तो परिस्थितीला शरण जातो आणि प्रत्येक वाईट गोष्ट घडण्याला पत्नीला कारण मानतो.

स्त्री भाग्येन भवेत्लक्ष्मीः पत्युरित्युच्यते जनैः।

अहो त्वदभाग्ययोगेन दुर्भिक्षं न जहाति माम् ॥ [३८]

वास्तविक इतक्या वाईट स्थितीत पत्नी त्याला सोडून न जाता त्याच्याशी समझोता करून राहत आहे यावरून तिचा समंजस स्वभाव जाणवतो. तिच्यामुळे ते कुटुंब व्यवस्थित राहते आहे. वडील आणि आई यांच्यातील भांडणामुळे मुलांच्यातही सलोखा नाही आणि दारिद्रयामुळे सर्वांची सारासार विचार करण्याची कुवत नाहीशी झालेली असल्यामुळे आर्थिक सुबत्ता मिळण्याची संधी आलेली असतानाही ते ती घालवून बसतात.

४) **चिपीटकचर्वणम् :-**

चिपीटकचर्वणम् ही कथा अशा एका कंजूष आणि मूर्ख माणसाची आहे जो स्वतःच्या कंजूषपणापायी स्वतःचे शरीरस्वास्थ्य गमावतो आणि लोभीपणामुळे हाती असलेले धनही गमावून बसतो.

कपाली हा कंजूष आणि लोभी धनवान आहे जो नोकराने जुन्या फाटक्या चपला बाहेर टाकून दिल्याने आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. जुनी छत्री टाकून दिल्याने तो दुःखी होतो. त्याच्या म्हणण्यानुसार त्याला ही संपत्ती मुला नातवांसाठी जपून ठेवायची आहे.

आतपवर्षात्राणं हर्षाय यच्छरणमापन्नानाम् ।

कर्त्तितबालद्रुमवत् पथि तत् पातितमहो स्पद्र्धा ॥

मम पुत्रपौत्रसुखभोग्यं छत्रमिदं निक्षिपसि निर्दयम् ? [३९]

बाहेर एक कुत्रा जुनी चप्पल तोंडात घेऊन जाताना दिसल्यानंतर ते त्याच्यामागे धावतो आणि त्याला श्वानदंश होतो. वैद्याच्या उपाय सांगण्यावर आणि त्याचे शुल्क ऐकल्यावर तो पिसाळण्याचा अभिनय करत त्याच्यावर धावून जातो.

त्याची पत्नी रंगिणी त्याच्यावर उपचार करण्यासाठी तांत्रिकाला बोलावते जो निर्लोभी असण्याचे नाटक करतो व अनुष्ठान पूर्ण होईपर्यंत सर्वांनी चिवडा खाऊन रहाण्याचा सल्ला देतो. यावर कपाली अन्नखर्च वाचल्यामुळे खूश होतो. अनुष्ठान करण्यासाठी मांत्रिक कलशात सोने टाकायला सांगतो. बरीच घासाघीस केल्यानंतर

कपाली एक तोळा सोने टाकण्यास तयार होतो. त्याला पेयातून झोप येण्याचे औषध देऊन तांत्रिक ते सोने रंगिणीला देतो व कपालीला ते सोने नोकराच्या स्पर्शाने वितळल्याचे सांगून निघून जातो.

या प्रहसनाची पार्श्वभूमी कौटुंबिक आहे. अतिशय कंजूष असलेला कपाली स्वतःच्या पत्नीसाठीही खर्च करण्यास तयार होत नाही तसेच त्याला नोकरांनी वागलेलेही आवडत नाही. जुन्या चपला आणि मोडकी छत्री यासाठी तो स्वतःचा जीव गहाण ठेवण्यास तयार होतो. यावरुन त्याचा कंजूषपणा सिद्ध होतो. असे असूनही चारचौघात तो स्वतःच्या प्रतिष्ठेलाही जपतो. नोकर जेव्हा रस्त्यातून चपला आणून देतो तेव्हा त्याला समजते की त्याला रडताना पाहून एका दयाळू माणसाने त्याला दिल्या तेव्हा तो त्याला प्रतिष्ठेला धक्का पोहोचल्याबद्दल रागवतो.

पत्नीलाही कपालीच्या कंजुषपणाचा कंटाळा आला आहे.

नमोऽस्तु पतिदेवाय ब्रह्मविष्णूस्वरूपिणे ।

चतुर्मुखोऽसि कलहे ताडने च चतुर्भजः॥ [४०]

पण या धनलोभी माणसाकडून काही मिळण्याची शक्यता नाही हे जाणून तिला शेजाऱ्यांची व तांत्रिकाची मदत घ्यावी लागते. पती - पत्नीमधे सौहार्दपूर्ण संबंध नसल्यामुळे ही वेळ येते. कपाली हा कुटुंबप्रमुख आहे. या नात्याने खरेतर त्याने प्रत्येकाची जबाबदारी घेतली पाहिजे परंतु त्याला त्याच्या जबाबदारीची जाणीव नसल्यामुळे त्याला कुटुंबासाठी असलेल्या आपल्या कर्तव्याला मुकावे लागत आहे. एक परिपूर्ण कुटुंब होण्यासाठी पती - पत्नी या दोघांच्याही सहयोगाची अपेक्षा असते. पण कपालीच्या स्वभावामुळे ते शक्य होत नाही.

**निष्कर्ष :-**

कौटुंबिक मुद्दयांचा विचार करताना श्री. जीव यांनी आपल्या लेखनात विविधता आणली आहे. पती-पत्नी, भाऊ - बहीण, मालक - नोकर इत्यादी नात्यांचा विविध अंगांनी विचार केलेला त्यांच्या लेखनात दिसून येतो.

कुटुंबातील प्रत्येक घटक व त्याचे इतरांशी असलेले संबंध यावर कुटुंबाचे सौख्य व स्वास्थ्य अवलंबून असते. श्री. जीव यांनी रेखाटलेल्या कौटुंबिक संबंधात

ताण-तणाव जास्त जाणवतात. त्यांच्यात सुख व आपलेपणा यांना महत्त्व न देता पैशाला महत्त्व दिल्याचे जाणवते.

**राष्ट्रनिष्ठा :-**

राष्ट्र हे समाजातील अनेक समूहांनी तयार होत असते. जरी हे समुह अनेक असले तरी त्यांची सर्वांची राष्ट्रासाठी श्रद्धा असते, आपलेपणा असतो. आपण ज्या राष्ट्रात राहतो त्यासाठी आपली काही कर्तव्ये असतात. जर राष्ट्रावर संकट आले तर आपण त्यासाठी मदत करतो. देशबांधवांचे संरक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. पूर्वीच्या काळापासून ही राष्ट्रनिष्ठेची भावना सर्वच लेखकांनी आपल्या साहित्यातून व्यक्त केली आहे. किंबहुना राष्ट्रनिष्ठेचे गोडवे गाणारी अनेक नाटके व साहित्यकृतीही लिहिल्या गेल्या आहेत.

"राष्ट्रार्थे सर्वस्वं त्यजेत् ।"

अशी उक्तीही प्रसिद्ध आहे.

ज्या राष्ट्राने आपल्याला एक ओळख दिली त्या राष्ट्रावर परचक्र आले. नैसर्गिक आपत्ती आल्या तर आपणही मदतीचा हात दिला पाहिजे ही राष्ट्रभावन प्रत्येक देशप्रेमी मनात जागृत असते. वेळोवेळी याच भावनेतून प्रत्येक राष्ट्रात उठाव झाले, लढाया झाल्या, चळवळी झाल्या आणि प्रत्येक स्वातंत्र्यप्रेमी माणसाने राष्ट्राचे स्वातंत्र्य जपण्याचा प्रयत्न केला. याचे वर्णन इतिहासातील अनेक साहित्यकृतींच्या रूपाने अमर झाले आहे. श्री. जीव यांनीही भारताचा स्वातंत्र्यलढा आपल्या साहित्यकृतींमधे वर्णन केला आहे. श्री. जीव यांनी आपल्या लेखनात उपरोधात्मक वर्णनशैलीचा वापर केला आहे. भारताच्या १५० वर्षे चाललेल्या स्वातंत्र्यसंग्रामापैकी दुसरे महायुद्ध आणि स्वातंत्र्यापूर्वीची काही वर्षे हा काळ आणि त्यातील काही घटना श्री. जीव यांनी आपल्या प्रहसनात चित्रित केल्या आहेत. लेखकाने केवळ वर्णनात्मक शैली न वापरता उपरोधात्मक शैलीचा वापर केला आहे. काही ठिकाणी रूपकेही वापरली आहेत.

१) स्वातंत्र्यसन्धिक्षणम् :-

JAYAKAR BALASAHEB KHARDEKAR LIBRARY

इ.स. १९४७ साली भारताला अखेर स्वातंत्र्य मिळाले परंतु ते विभाजित स्वरूपात मिळाले. या विभाजनामागील कारणे श्री. जीव यांनी प्रतिकात्मक स्वरूपात मांडली आहेत. लेखकाने काही पात्रे रूपकात्मक स्वरूपात वर्णन केली आहेत.

या प्रहसनामधे भारतमाता, प्राच्य संस्कृती (प्राचीन पौर्वात्य संस्कृती), नव्यत्रय ही सर्व पात्रे रूपकात्मक आहेत. ही प्राचीन भारतीय संस्कृती आहे जेथे आपल्या मातृभूमीला मातेचा दर्जा देण्यात आला आहे. जगाच्या पाठीवर इतर कोणत्याही देशात आपल्या देशाला मातेचा दर्जा दिला जात नाही. रामायणात रामाच्या तोंडीही "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियसि ।" असा उल्लेख आढळतो. या प्रहसनातही भारताला भारतमाता असे संबोधण्यात आले आहे. स्वातंत्र्याच्या उंबरठयावर प्राच्य संस्कृती आणि नव्यत्रय हे बहीण भाऊ आहेत.

या प्रहसनामधे आंग्ल प्रतिनिधी श्वेतांग हा धर्माच्या आधारे हिंदू व मुस्लिम यांच्यात फूट पाडून त्या आधाराने भारताचे दोन तुकडे करतो. प्राच्य संस्कृतीला मातेची ही विटंबना व ओढाताण पाहवत नाही पण स्वतंत्रतेच्या मोहापायी अंध झालेल्या माहम्मद आणि नव्यत्रयांना मात्र शासक म्हणून स्वतंत्र देशाची सत्ता हवी आहे. प्राच्य संस्कृती ही कोणत्याही सच्चा भारतीयाचे प्रतिनिधित्व करते. कारण कोणत्याही देशप्रेमी भारतीयाला भारतमातेची विटंबना आणि फाळणी मान्य नाही. माहम्मद हा पाकिस्तानचे प्रतिनिधित्व करतो.

पाकिस्थानस्थापनं नः प्रतिज्ञा उष्णैः शोणितैर्जयामः ।

युद्धमाना ननु तावद्वयं न भीताः सम्पादयितुं सर्वथा इष्टकार्यम् ॥ [४१]

भारत-पाकिस्तानची फाळणी झाल्यानंतर जे सांप्रदायिक दंगे उसळले तेही येथे प्रतिकात्मक रूपात दाखवले आहेत. राष्ट्र ही संकल्पना नव्यत्रयांना केवळ शासनापुरतीच मान्य आहे. त्यांना भारतमातेप्रती आपली काही कर्तव्ये आहेत हे ज्ञातही नाही. हे सध्याच्या चंगळवादी संस्कृतीचे प्रतीक आहे. केवळ धर्माच्या आधारे कोणत्याही राष्ट्राचे विभाजन होऊ शकत नाही. जरी अनेक धर्म असले तरी

धर्मनिरपेक्षपणे प्रत्येकाला न्याय मिळावा, प्रत्येकाला सुखाने जगता यावे ही भारतीय संस्कृती आहे.

या प्रहसनामधे यतिराट् व प्राच्यसंस्कृती ही राष्ट्रनिष्ठेची उदाहरणे आहेत तर भारतमाता ही खऱ्या आईचे प्रतिकात्मक रूप दखवले आहे. येथे आईला आपली सर्वच मुले हवी आहेत परंतु मुलांना मात्र आईचे विभाजन हवे आहे. जेथे सर्व नागरिक सर्व धर्म राष्ट्राशी निष्ठा बाळगून राहतील तोच देश प्रगतीच्या मार्गावर पोहोचू शकतो. प्रत्येक नागरिकाने स्वतःचे हित न पाहता देशाचे हित पाहिले पाहिजे. नव्यत्रय या आधुनिक भारतीयांप्रमाणे प्रत्येकाला इतर देश, भाषा, विज्ञान यांची माहिती असलीच पाहिजे परंतु त्यांना स्वतःची संस्कृती, परंपरा यांचे भान असले पाहिजे आणि त्यांनी त्याचा आदरही केला पाहिजे.

श्री. जीव यांनी आपल्या सर्व प्रहसनांमधे भारतीय संस्कृती, सभ्यता आणि परंपरा यांचे महत्त्व सांगितले आहे.

२) **चण्डताडवम् :-**

पाश्चात्य संस्कृतीतील भौतिकवाद आणि भारतातील पूर्वापार चालत आलेला अध्यात्मवाद या दोहोंमधील संघर्ष श्री. जीव यांनी आपल्या या प्रहसनात चित्रित केला आहे. भारतात प्राचीन चिंतन परंपरा आहे आणि त्यामधे शांती, अहिंसा, अध्यात्म, सद्‌भावना यांना महत्वाचे स्थान आहे. याउलट इतर देशांमधे भौतिकवादाला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. या देशांमधे भौतिक सुख, चंगळवाद यांना स्थान मिळाले आहे. धर्म व आध्यात्मिकता यांना येथे कोणतेही स्थान नाही.

अयंच धर्मो दूषणो विवेकिनां भूषणं कपटपटूनां घातकः सर्वशुभानां पातकंश्च सर्वराष्ट्राणाम् । [४२]

धर्मपुरुष हा भारतीय धर्माचे तर रूष्यनायक हा भौतिकवादाचे प्रतीक आहेत. भारतातील प्राचीन संस्कृती व धर्माचे रक्षण करणे हे धर्मपुरुषाचे काम आहे. या धर्मपुरुषाला भारताबद्‌दल आदर व अभिमान आहे.

न खलु सम्भवति धर्मविना राष्ट्रनिर्माणम् ।

धर्ममूलं पुनः स ईशिताः विश्वेषाम् । [४३]

या संस्कृतीमुळेच भारताचे इतर अपप्रवृत्तींपासून रक्षण होत आहे. चंगळवाद आणि भौतिकवादामुळे भारताच्या प्राचीन संस्कृतीचा ऱ्हास होत आहे. भारतात इतर देशांइतका भौतिकवाद पसरलेला नाही याला कारण येथील प्राचीन संस्कृती आहे.

धर्मपुरुष हा राष्ट्रनिष्ठ आहे. सर्व युरोप काबीज करून चंगळवाद भारताच्या दिशेने येतो पण धर्मपुरुषाच्या ज्योतीमुळे, राष्ट्रनिष्ठेमुळेच तो भारतात प्रवेश करू शकत नाही. दुष्ट भावनांचे प्रतीक असलेले लोभ, क्रोध, हिंसा, पाप इत्यादी धर्मपुरुषासमोर टिकू शकत नाहीत. चण्डताण्डव या प्रहसनामधे भारतीय संस्कृती व परंपरा यांचाच उद्‌घोष केला गेला आहे.

जगातील कोणत्याही देशापेक्षा भारतीय संस्कृती ही प्राचीन आहे. हिंसात्मक पद्‌धतीने आपला विचार दुसऱ्यावर लादण्यापेक्षा इतर विचार असलेल्या लोकांना आपल्यात सामावून घेऊन आपली विचारधारा उदार आणि सर्वसमावेशक होऊ शकते.

धर्महीना नीतिरपि स्वरहीना गीतिरिव विफला । [४४]

भारतातही अशीच विचारधारा असल्यामुळे आपली प्राचीन संस्कृती आपले अस्तित्त्व टिकवून आहे. हीच विचारधारा भारताची राष्ट्रनिष्ठा जतन करते.

**निष्कर्ष** :-

श्री जीव यांनी समाजातील राष्ट्रनिष्ठेचे आदर्श असलेली पात्रे रेखाटली आहेत जगातील सर्व देशांमधे स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढे झाले, बंडखोरी झाली. भारतातही झाली. भारतात आपली राष्ट्रनिष्ठा काहींनी बंडखोरी करून व्यक्त केली तर काहींनी सत्याग्रह करून. या सर्वांचे चित्रण श्री. जीव यांच्या लेखनातून होते. राष्ट्र हा केवळ भूप्रदेश नसून तेथे राहणाऱ्या जिवंत व्यक्तींनी राष्ट्र बनते. ते राष्ट्र एकसंध राहण्यासाठी सर्वसमावेशक भूमिका आवश्यक आहे. श्री. जीव यांनी आपल्या

प्रहसनांमधून राष्ट्रनिष्ठा व्यक्त केली आहे. तसेच जागतिक राजकारणाची जाणही त्यांच्या लेखनातून व्यक्त होते.

## ७) **विज्ञान :-**

समाजशास्त्राचा अभ्यास करत असताना त्याच्या वैज्ञानिक पैलूचा विचार केल्याशिवाय त्याला पूर्णत्व येत नाही. कोणतेही शास्त्र हे वैज्ञानिक पायावरच उभे असते. विज्ञान हे मानवी गरजांचे मूर्त स्वरूप आहे. गरजांमुळेच मानवाला नवेनवे शोध लागले. लोकसंख्यावाढ, वाढत्या गरजा, माणसांना जास्त कामामुळे मिळणारा कमी वेळ या सर्वामुळे माणसांना नवीन शोध आणि विज्ञानाच्या नवनवीन पैलूंचा विचार करणे भाग पडले आहे.

श्री. जीव यांनी देखील २० व्या शतकात लागलेल्या विज्ञानातील नवीन शोधांचा उल्लेख आपल्या लेखनात केला आहे.

शतवार्षिकम् :-

'रूपकचक्रम् ' या नाटयसंग्रहामधे प्रकाशित झालेल्या या प्रहसनामधे मानवी शोधांमुळे झालेला ग्रहांवरचा परिणाम चित्रित करण्यात आला आहे. विज्ञानातील प्रगतीच्या प्रभावामुळे ग्रहांवरही परिणाम होऊ लागला आहे असे यात दाखविण्यात आले आहे.

पृथ्वीवरील एक मानव रॉकेट यान घेऊन ब्रह्मलोकाजवळ पोहोचतो. तेथे द्वारपालांसोबत त्याची झटापट होते. मंगळ तेथे ब्रह्मदेवाला भेटण्यासाठी येतो तेव्हा तो मानवाला पाहून घाबरतो कारण रॉकेटमुळे त्याच्या पाठीच्या मणक्याला दुखापत होऊन तो कुबडा होतो. तो जेव्हा मानवाला धमकावू पाहतो तेव्हा तो मानव त्याला असे सांगतो की तूच काय इतर ग्रह जसे बुध, शुक्र यांचीही अवस्था वाईट होणार आहे.

कुजःकुब्जःकृतश्चन्द्रो मन्दभासो बुधोऽबुधः।<br>
कविःषविहतप्रायो राहूर्हाहारवे रतः ॥ [४५]

चंद्र, बुध, शुक्र हे एकत्र असताना चंद्र आपली दुर्दशा सांगतो. त्याच्याकडे असलेल्या अमृताच्या लोभाने त्याच्यावर अस्त्रांचा मारा होत आहे तेव्हा बुध त्याला त्याच्या रक्षणासाठी दोन मडकी टांगण्यास सांगतो ज्यामुळे अमृत खाली न पडता त्यात पडेल. बुध शुक्राच्या रक्षणासाठी त्याला डोक्यावर घडा बांधण्यास सांगतो. मानवाने रॉकेट सुरु केल्यावर सर्व भयभीत होतात. त्यावेळी राहू येऊन त्यांना धीर देतो व रक्षणाचे आश्वासन देतो. सर्वजण मिळून त्याला ब्रह्मदेवाकडे घेऊन जातात. ब्रह्मदेवाला त्याच्यापासून रक्षण करण्याचा उपाय विचारल्यानंतर ब्रह्मदेव म्हणतो की विज्ञानाच्या अतिवापरामुळे आणि यांत्रिकीकरणामुळे पृथ्वी पुढील शंभर वर्षात नष्ट होणार आहे.

क्रियेत् चेन्न यन्त्रीयविज्ञानस्य नियन्त्रणम् ।
शतवर्षान्तरे पृथ्वी नूनं ध्वस्ता भविष्यति ॥ [४६]

या रूपकाद्वारे जगभरात विज्ञानाद्वारे होणारी प्रगती, लागणारे शोध यांचा मागोवा घेतला आहे. विज्ञानामुळे मानवाला कितीही जरी उपयोग होत असला तरी त्याचा वापर नियंत्रित असायला हवा असे येथे सुचविण्यात आले आहे. अणूचा शोध घडवून आणला गेला. म्हणूनच विज्ञानाचा वापर योग्य पद्धतीने व्हायला हवा अन्यथा पृथ्वीला त्यापासून धोका संभवतो असे येथे सुचवले गेले आहे.

**निष्कर्ष** :-

या प्रहसनामधे आधुनिकता आणि प्राचीन विचारसरणी यांचा मेळ घालण्यात आला आहे. रॉकेटधारी मानव●मर्त्यमणी हा आधुनिकतेचे प्रतीक आहे. तरीही प्रहसनामधे चंद्राला गिळंकृत करणारा राहू, चंद्रावर असलेले अमृताचे साठे इ. पौराणिक कथांचाही आधार घेण्यात आला आहे.

**वनभोजनम् :-**

श्री. जीव यांनी वनभोजन हे प्रहसन लिहिले आहे. या प्रहसनामधे सहा मित्र वनामधे भोजनासाठी जातात. सुप्रिय, देवीप्रिय, सुमन्त्र, सुबुद्धी, अभिराम,

अतिप्रिय अशी त्यांची नावे आहेत. त्यातील प्रत्येकाने आपापले काम ठरवून घेतले आहे.

एका मोठया झाडाखाली जेवण बनवण्याची योजना एका पक्ष्याच्या विष्टा करण्याच्या शक्यतेमुळे सफल होऊ शकत नाही. शेवटी जवळ असलेल्या जुन्या मंदिरात जेवण तयार करण्याची योजना तयार होते. तेथे जवळपास असलेल्या झाडीत हालचाल दिसल्याने तेथे वन्य श्वापद असण्याच्या भयाने लाकडे गोळा करण्यासाठी गेलेल्या दोन मित्रांपैकी सुबुद्धी सुप्रिय याला सोडून एकटा पळून जातो.

तेथे एक वृद्ध याचक आहे त्याला भिक्षा मिळण्याची अपेक्षा आहे. बऱ्याच वेळाने सुबुद्धी परत येतो. तेव्हा जेवण तयार होऊन वाढणे चालू असते. आपल्याला एकटे सोडून पळून आल्याबद्दल रागाने तो तेथील दिवा विझवतो. दिवा लावणे हे काम कोणाच्याच वाटयाला आलेले नाही. त्यामुळे अतिप्रिय असे सुचवतो की जो प्रथम बोलेल तो दिवा लावेल. यामुळे वाढलेले जेवण तसेच ठेवून ते गप्प बसून राहतात. तो याचक तेथे येऊन दिवा लावतो आणि वाढलेले जेवण घेऊन निघून जातो.

तेथे रक्षक एका चोराचा शोध घेत येतात. त्या याचकाला पकडत असताना तो देवळात बसलेल्यांकडे निर्देश करून पळून जातो. त्यांची चौकशी करत असताना ते अतिमद्यसेवनामुळे बोलत नाहीत असा समज करून घेऊन ते तीनही रक्षक त्यांना मारतात. मारत असताना अतिप्रिय ओरडतो व उरलेले पाच जण दिवा पेटवायची जबाबदारी त्याच्यावर टाकतात. रक्षकांना ही सर्व गोष्ट समजल्यानंतर त्यांच्या निर्बुद्धपणाची निंदा करत ते निघून जातात.

या प्रहसनाचे कथानक वर्गीकरणाच्या कोणत्याच प्रकारात मोडत नाही.

**निष्कर्ष** :-

श्री. जीव यांनी आपल्या प्रहसनांमधून समाजातील विविध प्रथा, परंपरा, घटना यांचे वर्णन केले आहे. या सर्वांमधून समाजशास्त्राच्या विविध पैलूंचे दर्शन होते.

श्री. जीव यांच्या लेखनात विविधता आढळून येते. पूर्वापार चालत आलेल्या अश्लील प्रहसनांची वाट सोडून श्री. जीव यांनी प्रहसनांचे पुनरूज्जीवन केले आहे असे म्हणायला हरकत नाही. श्री. जीव यांनी पारंपरिक धार्मिक विषयांवरच नव्हे तर विसाव्या शतकात सुरू असलेल्या घटनांना अनुसरून विविध विषयांवर विविधांगी लेखन केले आहे.

# संदर्भ सूची

१) स्वातंत्र्यसन्धिक्षणम् (पृ. ५७)

२) स्वातंत्र्यसन्धिक्षणम् (पृ. २६)

३) चण्डताण्डवम् . (प्राक्कथन )

४) चण्डताण्डवम् (पृ. ६)

५) चण्डताण्डवम् (पृ. ६)

६) पुरुषरमणीयम् (पृ. ५,६)

७) विवाहविडम्बनम् (पृ. ९२)

८) विवाहविडम्बनम् (पृ. ९२)

९) दरिद्रदुर्दैवम् (पृ. ३)

१०) दरिद्रदुर्दैवम् (पृ. १५)

११) दरिद्रदुर्दैवम् (पृ. १०)

१२) चौरचातुरियम् (पृ. १३७)

१३) चौरचातुरियम् (पृ. १३९)

१४) क्षुतक्षेमीयम् (पृ. २५,२६)

१५) क्षुतक्षेमीयम् (पृ. ३१)

१६) चिपीटकचर्वणम् (पृ. ४३)

१७) चिपीटकचर्वणम् (पृ. ५१)

१८) चिपीटकचर्वणम् (पृ. ५७)

१९) चिपीटकचर्वणम् (पृ. ६२)

२०) विवाहविडम्बनम् (पृ. ९२)

२१) विवाहविडम्बनम् (पृ. ९३)

२२) विवाहविडम्बनम् (पृ. ७८)

२३) विवाहविडम्बनम् (पृ. ९२)

२४) रागविरागम् (पृ. ३)

२५) रागविरागम् (पृ. ५)

२६) रागविरागम् (पृ. १४)

२७) रागविरागम् (पृ. १७)

२८) रागविरागम् (पृ. १७)

२९) रागविरागम् (पृ. १८)

३०) विधिविपर्यासम् (पृ. ६)

३१) विधिविपर्यासम् (पृ. १७)

३२) विधिविपर्यासम् (पृ. ८)

३३) विधिविपर्यासम् (पृ. १८)

३४) विवाहविडम्बनम् (पृ. ७९)

३५) विवाहविडम्बनम् (पृ. ८२)

३६) विवाहविडम्बनम् (पृ. ८२)

३७) दरिद्रदुर्दैवम् (पृ. १५)

३८) दरिद्रदुर्दैवम् (पृ. ६)

३९) चिपीटकचर्वणम् (पृ. ४६)

४०) चिपीटकचर्वणम् (पृ. ४४)

४१) स्वातंत्र्यसन्धिक्षणम् (पृ. ५७)

४२) चण्डताण्डवम् (पृ. ४)

४३) चण्डताण्डवम् (पृ. ६)

४४) चण्डताण्डवम् (पृ. ६)

४५) शतवार्षिकम् (पृ. ८४)

४६) शतवार्षिकम् (पृ. ८४)